संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६



# दादा गेले



## महाराष्ट्राला हादरा

## अजित दादांची एक्झिट

**बारामती : (समर्थ गांवकरी)**

कणखर आणि धडाडीचे नेते अशी ओळख असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी सकाळी नऊच्या सुमारास बारामतीत विमान अपघातात मृत्यू झाला. या अनपेक्षित घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. पवार यांच्या पार्थिवावर आज (गुरुवारी) सकाळी ११ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. ते ६६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई आशाताई, पत्नी सुनेत्रा पवार, पुत्र पार्थ व जय असा परिवार आहे. विमान दुर्घटनेत वैमानिकासह आणखी चौघांचा मृत्यू झाला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यसंस्कार पार पडतील. यावेळी सर्वपक्षीय नेते उपस्थित राहणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्याने सांगितले.



पवार यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांसह देशभरातील विविध पक्षांच्या नेत्यांनी दुःख व्यक्त केले. पंतप्रधान मोदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधत घटनेची माहिती घेतली.

अजित पवार जिल्हा परिषदेच्या निवडणूक प्रचारासाठी मुंबईहून बारामतीकडे निघाले होते. बारामतीत त्यांच्या चार सभांचे आयोजन करण्यात आले होते. काल सकाळी ८.५० च्या सुमारास विमान अपघात झाला. या घटनेत अजित पवार यांसह त्यांचे मुख्य सुरक्षा रक्षक विदीप जाधव, वैमानिक सुमित कपूर, शांभवी पाठक, विमान कर्मचारी पिंकी माळी यांचा मृत्यू झाला. महाराष्ट्राचे लाडके नेतृत्व असलेल्या दादांच्या अकाली जाण्याने सर्वांनाचा मोठा धक्का बसला आहे. कोणाचाच या बातमीवर विश्वास बसत नव्हता. विमानतळाजवळील एका शेतात हे विमान कोसळले. अपघातग्रस्त विमान आगीत पूर्णपणे खाक झाले. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, सकाळी पावणे नऊच्या सुमारास विमानाने विमानाने विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न केला. मात्र, पहिल्या प्रयत्नात विमान उतरले नाही. दुसऱ्यांदा प्रयत्न करताना विमान धावपट्टीच्या बाजूला खडकाळ माळरानावर जाऊन आदळले. त्यानंतर मोठा स्फोट झाला.

### अन् तिसऱ्या गिरकीला कोसळले विमान

नेहमीप्रमाणे सकाळी मुलांना घेऊन शाळेत निघाले होते. तेवढ्यात एक विमान आले आणि धावपट्टीवर न उतरता ते दोन वेळा एकदम खालून गेले. विमान खाली कोसळते की काय, असे वाटत असतानाच तिसऱ्या वेळी खाली कोसळले. त्यानंतर मोठा स्फोट झाला. स्फोटावर मृतदेह इकडे-तिकडे पडले होते. दहा मिनिटांनी अग्निशमन दलाची वाहने आली. आगीच्या ज्वाला प्रचंड असल्याने आग विझवण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यानंतर मृतदेह बाहेर काढण्यात आले. तेव्हा कळाले त्यात माझा दादा आहे आणि माझी बोलतीच बंद झाली, अशी माहिती प्रत्यक्षदर्शी अनिता आटोळे यांनी दिली. ज्या ठिकाणी विमान कोसळले त्याच्या १०० मीटर अंतरावर आटोळे कुटुंबीय राहतात. एकत्रित कुटुंब असल्याने घरात १४ जण राहतात. नेहमीप्रमाणे सकाळी आंघोळ, धुणी-भांडीचे कामे सुरू होते. तेवढ्यात एक विमान आले. जवळच धावपट्टी असल्याने दररोज विमानांची आणि हेलिकॉप्टरची ये-जा सुरू असते. काल सकाळी नऊच्या सुमारास एक विमान आले. ते धावपट्टीवर उतरणार, असे वाटत असतानाच विमानाने दोन फेऱ्या मारल्या. तेव्हा विमान खूप खाली आले होते. त्यावेळेस वाटले की कुठे गावात विमान कोसळते की काय ! आणि थोड्या वेळात खाली कोसळले. त्यानंतर मोठा आवाज झाला आणि विमानाला मोठी आग लागली. त्यानंतर दोन-तीन स्फोट झाले. आवाज ऐकून माझे पती आणि मुले पळत आले. मात्र, आगीने रौद्ररूप धारण केल्याने काही करता येत नव्हते. ज्यावेळी अग्निशमन दलाचे जवान आले तेव्हा त्यांनी आग आटोक्यात आणण्यास सुरुवात केली. आमच्याकडील पाण्याचा टँकर बाहेर गेला होता. त्यामुळे आम्हाला काही मदत करता आले नाही, याचे आम्हाला मला फार वाईट वाटते, असे आटोळे कुटुंबीयांनी सांगितले.


### या चौघांनीही विमान दुर्घटनेत गमावले प्राण



कॅप्टन सुमित कपूर | कॅप्टन शांभवी | कर्मचारी पिंकी माळी | विदीप जाधव

बारामती विमान दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये अन्य जणांमध्ये दोन वैमानिक, एक कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांचा समावेश आहे. दोन वैमानिकांमध्ये कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन शांभवी पाठक, विमान कर्मचारी पिंकी माळी, सुरक्षा रक्षक विदीप जाधव, अशी त्यांची नावे आहेत. कॅप्टन सुमित कपूर हे अत्यंत अनुभवी वैमानिक होते. त्यांच्याकडे विमानाचे उड्डाण करणे आणि ते उतरविणे यांची जबाबदारी होती. त्यांना १६ हजार तासांचा विमान उड्डाणाचा अनुभव होता. सहारा, जेटलाइन आणि जेट एअरवेज कंपनीत त्यांनी काम केले होते. त्यांना सर्व प्रकारच्या विमानांचे सारथ्य करण्याचा दांडगा अनुभव होता. कॅप्टन शांभवी पाठक या सहवैमानिक होत्या. माजी लष्करी अधिकाऱ्यांची ती मुलगी होती. एअर फोर्स बालभारतीमधून आणि मुंबई विद्यापीठातून त्यांनी एरोनॉटीक्स, एव्हीएशन अँड एरोस्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी विषयातून बीएससी पदवी घेतली होती. न्यूझिलंडमधील आंतरराष्ट्रीय व्यावसायिक पायलट अकादमीमधून पुढील प्रशिक्षण घेतले. विमान कर्मचारी पिंकी माळी या मुंबईतील वरळीच्या रहिवासी आहेत. त्या दुर्घटनाग्रस्त विमानात फ्लाइट अडेंडंट म्हणून कार्यरत होत्या. विदीप जाधव हे अजित पवार यांचे अंगरक्षक होते. महाराष्ट्र राज्य गुप्तचर विभागाच्या विशेष सुरक्षा विभागातून पवार यांच्या सुरक्षेसाठी कार्यरत होते. ते ठाण्याचे रहिवासी होते. ते मूळचे मुंबई पोलिस दलातून त्यांची विशेष सुरक्षा विभागात बदली झाली होती.

### हा अपघातच; राजकारण नको : शरद पवार



बारामती : अजित पवार यांचा अपघाती मृत्यू हा महाराष्ट्राला प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्ववान आणि निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र आज मुकला. अजित पवार यांच्या जाण्याने जे नुकसान झाले, ते कधीच भरून निघणारे नाही. पण, सर्वच गोष्टी काही आपल्या हातात नसतात, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. पवार पुढे म्हणाले की, मी प्रसारमाध्यमांसमोर येणार नव्हतो. मात्र, अपघातामागे काही राजकारण आहे, अशा प्रकारची भूमिका कोलकत्त्यावरून मांडली गेली, असे माध्यमांद्वारे कळले. पण, यात राजकारण नाही, हा निव्वळ अपघात आहे. या मृत्यूच्या यातना महाराष्ट्राला, आम्हा सर्वांना आहेत. कृपया यात राजकारण आणू नये. एवढेच सांगायचे आहे.

### सहाचा असाही योगायोग

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे काल सकाळी बारामतीजवळ विमान अपघातात निधन झाले. ६६ वर्षांच्या या कणखर नेत्याने आपल्या राजकीय जीवनात तब्बल ६ वेळा उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती. त्यांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा कालावधीही ६६ वर्षे, ६ महिने आणि ६ दिवस असा असल्याने समाज माध्यमावर '६' या अंकाचा हा दुर्दैवी योगायोग चर्चेचा विषय ठरला आहे. नेटकऱ्यांनी याला नियतीचा खेळ म्हणून भावूक प्रतिक्रिया दिल्या आहेत.

नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या निमित्ताने २८ नोव्हेंबर २०२५ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अखेरची प्रचारसभा मंचर येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेला नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. अजित पवार यांच्या भाषणात नेहमीची तडफ, स्पष्टपणा आणि अनुभवातून आलेली आत्मीयता दिसून आली. भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी मंचर आणि आंबेगाव तालुक्याशी असलेल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

जन्म : २२ जुलै १९५९

मृत्यू : २८ जानेवारी २०२६

# “अजितदादा म्हणजे कार्यकर्त्यांची ढाल!”

## दिलदारपणा, शब्दाला जागणं आणि माणुसकीचा झरा हरपला : खासदार नीलेश लंके भावूक

**पारनेर: (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या राजकारणात दिलदारपणा, माणुसकी आणि कार्यकर्त्याला न्याय देणारे नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. “अजितदादांचे जाणे ही केवळ त्यांच्या कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राची हानी आहे,” अशा शब्दांत खासदार नीलेश लंके यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अजितदादांसोबतचा प्रदीर्घ राजकीय आणि भावनिक प्रवास उलगडताना लंके भावूक झाले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या निमित्ताने अजितदादांसोबत शेवटची भेट झाल्याचे सांगताना लंके म्हणाले की, “मी शरद पवार यांच्या गटाचा खासदार असतानाही अजितदादांनी मला नेहमी मदत केली. राजकीय मतप्रवाह वेगळे असले, तरी दादांचे प्रेम आणि आपुलकी कधीच कमी झाली नाही.” विधानसभेत आमदार म्हणून काम करत असताना अजितदादांनी मला सर्वात जवळचा आमदार मानून सातत्याने निधी दिला, हे त्यांनी आवर्जून नमूद केले.

शिवसेना पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर पुढचा मार्ग काय, हा प्रश्न उभा राहिला असताना रमेश थोरात यांच्या माध्यमातून अजितदादांची भेट झाल्याची आठवण लंके यांनी सांगितली. “गेल्या तीन निवडणुकांत राष्ट्रवादीचा उमेदवार पराभूत झाला आहे. मी सर्वेक्षण करून तुला कळवतो,” असे दादांनी सांगितले. सर्वेक्षणानंतर ‘नीलेश, तू फार पुढे आहेस, तुझी उमेदवारी फायनल’ अशी ग्वाही दादांनी दिली. उमेदवारीचा शब्द दिल्यानंतर पक्षप्रवेशालाही येण्याचे त्यांनी मान्य केले होते, मात्र ते शक्य झाले नाही.

नगर तालुक्यातील एका कार्यक्रमात पुन्हा भेट झाल्यावर लंके यांनी थेट प्रश्न विचारला “दादा, माझी उमेदवारी पक्की आहे ना?” त्यावर अजितदादांनी दिलेले उत्तर आजही लंके यांच्या मनात कोरलेले आहे. “जर मी तुला उमेदवारी देऊ शकलो नाही, तर मी बारामतीमधून उमेदवारी घेणार नाही.” हा शब्द अजितदादांच्या व्यक्तिमत्त्वाची साक्ष देणारा असल्याचे लंके म्हणाले.

विधानसभेत विजयी झाल्यानंतर कसे काम करायचे, प्रशासनाशी कसे वागायचे, विकासकामांचा वेग कसा वाढवायचा याचे मार्गदर्शन अजितदादांनी केले. “मी आमदार असताना जो विकासाचा डोंगर उभा राहिला, त्याचे श्रेय एकट्या अजितदादांनाच आहे. आजही पारनेर-नगर मतदारसंघात सुरू असलेली अनेक कामे दादांमुळेच मार्गी लागली,” असे लंके यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर आम्ही ठरवले की दादांसोबतच उभे राहायचे, असे सांगत लंके म्हणाले, “दादा हे भविष्यातील चेहरा आहेत, हे ओळखून आम्ही त्यांना साथ दिली.”



लोकसभा निवडणुकीवेळी शरद पवार यांचा फोन आला. “तू माढ्याकडून लढ,” अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. ही इच्छा दादांपर्यंत पोहोचवल्यावर दादांनी स्पष्ट सांगितले, “तुला आमदारकीचा राजीनामा द्यावा लागेल. कोणी सोसायटीचाही राजीनामा देत नाही, पण तरीही पवार साहेबांसाठी तू निवडणूक लढव. मी तुझ्या पाठीशी आहे.” लोकसभेला दादांनी भरभरून मदत केली, हे आज बोलण्यासारखे नसले तरी विसरण्याजोगे नाही, असे लंके म्हणाले. लोकसभा निकालानंतर दादांचा फोन आला. “अभिनंदन पठ्ठ्या! पवार साहेबांचे स्वप्न पूर्ण केलेस. तुझ्या पुढील वाटचालीस शुभेच्छा,” असे शब्द अजूनही कानात घुमत असल्याचे लंके म्हणाले. विधानसभा निवडणुकीत दादांनी माझ्या विरोधात सभा घेतल्या, मात्र वैयक्तिक टीका कधीच केली नाही. निवडणुकीनंतर पारनेरला आल्यावर “नीलेश, व्यासपीठावर तू नसशील, तर मजा नाही,” असे सांगणारे दादा म्हणजे माणुसकीचा कळस होते. कोरोनाच्या संकटात दादांची माणुसकी पुन्हा दिसली.

“कोणी भेटायला आला की दादा त्यांना सांगत, नीलेश लंकेच्या कोरोना सेंटरला मदत करा,” असे सांगताना लंके भावूक झाले. मास्क घाल, स्वतःची काळजी घे, असे फोन करून वारंवार सांगणारा नेता आज आपल्यात नाही, ही सल कायम बोचत राहील.

“राजकीय आणि सामाजिक जीवनात दादांनी मला प्रचंड साथ दिली. आमदार झाल्यावर मुंबईला पोहोचलो की सकाळी फोन करून विचारायचे किती वाजता पोहोचलास? लवकर येत जा, उशीर करू नकोस,” अशी आठवण सांगताना लंके यांचा आवाज भरून आला. राष्ट्रवादीत दोन गट झाले, तरी विचार मात्र एकच राहिले, असे त्यांनी नमूद केले.

### महाराष्ट्राची मोठी हानी

अजितदादा पवार यांचे अपघाती निधन ही केवळ एका नेत्याची नाही, तर कार्यकर्त्यांना बळ देणाऱ्या, शब्दाला जागणाऱ्या आणि माणुसकी जपणाऱ्या नेतृत्वाची अकाली एक्झिट आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झालेली ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे.



## उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आदरांजली

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधन च्या बातमी महाराष्ट्र सह देशभरात शोककला पसरल्या. तामसा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात आली यावेळी राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष नीलकंठ कल्याणकर,राष्ट्रवादी किसान आघाडी जिलाध्यक्ष शंकर जगदाळे, शहर अध्यक्ष प्रदीप (पप्पू )शेटे,धीरज (पप्पू )कदम, गणेश व्यवहारे,शारुख पठाण, अस्लम पठाण,वंचित आघाडी चे युवा तालुका अध्यक्ष जयकीन रावले, भाजप सोशल मीडिया चे सचिन तांदळे,भाजप पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती, गणेश व्यवहारे, रुपेश अमृते, व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष विजय लाभसेठवार, खंडेराव आगलावे,आंनता भोपळे, गणेश पवार, माजी सरपंच प्रभाकर महाजन, बालाजी वाकोडे, संतोष ठमके, विशाल भालेराव, संतोष नील्लावार,पत्रकार बाळासाहेब खानजोडे, गौतम कदम, डॉ उत्तम शिंदे, सरपंच आनंद घंटळवार, राष्ट्रवादी महिला आघाडी मनीषा जाधव, गीता बाई साळवे, अमोल वानखेडे, गजानन कल्याणकर, स. द कल्याने, सपोनि शहादेव खेडकर,विनायक शेटे सह सर्वपक्षीय, सामाजिक कार्यकर्ते, महिला पुरुष यांनी आदरांजली वाहिली.

## “घोटी–इगतपुरीत ‘ऑनलाईन मटका’चा महाघोटाळा

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

घोटी शहरासह इगतपुरी परिसरात अवैध मटका व्यवसायाने आता अत्यंत धोकादायक आणि संघटित स्वरूप धारण केले असून, पारंपरिक ‘चिटी पद्धत’ पूर्णपणे बंद करून सर्रासपणे ऑनलाईन मटका चालवला जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. विशेष म्हणजे, हा काळा धंदा शहराच्या मध्यवर्ती, वर्दळीच्या आणि रहिवासी भागातच बिनदिक्कत सुरू असूनही घोटी व इगतपुरी पोलीस प्रशासनाचे याकडे संशयास्पद दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

## ग्राम विकास मंडळ ओतूरचा ७३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर ता:- जुन्नर येथील ग्राम विकास मंडळ ओतूर चा ७३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी बाल किर्तनकार संचिता आमले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे हे होते. ग्राम विकास मंडळ ओतूरचे सचिव प्रदीप गाढवे माहिती देताना म्हणाले की , स्वर्गीय आमदार श्रीकृष्ण तांबे ( झांबरशेठ ),आमदार डी. के. राजर्षी,कृ.रा.घाटपांडे, लालचंद गुजर,भाऊ रामजी डुंबरे,डॉक्टर त्र्यंबक अवचट, राजाराम पाटील डुंबरे,हरि गेनूजी डुंबरे,ठकार सर,या सर्व तत्कालीन व्यक्तिंनी त्या वेळी शिक्षणाची गरज लक्षात घेऊन ५ जून १९४५ साली जुन्नर एज्यूकेशन सोसायटीच्या माध्यमातून चैतन्य विद्यालयाचं छोटसं रोपटं अवचटांच्या लहानशा वाड्यात लावलं.शिक्षणाला सुरुवात झाली. ओतूर परीसरातील वाडया वस्त्यांवरील अनेक गावांतील मुले शिक्षण घेऊ लागली.कालांतराने ग्राम विकास मंडळ असे या संस्थेचे नामकरण करण्यात आले.लहानरोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे.या संस्थेच्या चैतन्य विद्यालय ओतूर,पुष्पावती विद्यालय डिंगोरे , सरस्वती विद्यालय उदापूरअशा तीन शाखा विद्यालय असून यामध्ये २५०० हून अधिक विद्यार्थी सध्या शिक्षण घेत आहेत.या संस्थेच्या स्थापनेला ७३ वर्षे पूर्ण झाली आहेत .या ७३ वर्षाच्या काळात अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम या संस्थेने केले. शैक्षणिक क्षेत्रात एक नामांकित संस्था म्हणून ग्राम विकास मंडळ ओतूरकडे पाहिले जाते.



याप्रसंगी बाल कीर्तनकार ह.भ.प.संचिताताई आमले यांचे प्रबोधन पर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अनेक दाखले व उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. आपल्या गुरुजनांबद्दल आदर , श्रद्धा ,विश्वास ठेवा.चांगली ज्ञानप्राप्ती होईल संस्कार होतील आणि आपण आपल्या जीवनात मोठे होऊ .याप्रसंगी ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे ,माधवराव डुंबरे,प्रभाकर तांबे ,राजेंद्र डुंबरे ,रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे,पंकज घोलप, शांताराम पानसरे,नितीन तांबे,प्रतीक अकोलकर,राजश्री भालेकर,संजय हिरे,अनिल उकिरडे ,शरद ताजणे , प्रणाली आमले,रवि लोहोटे,सचिन तांबे, जालिंदर ढमाले व सर्व शाळांचे शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल उकिरडे व सूत्रसंचालन मिलिंद खेत्री यांनी केले.आभार सहसचिव पंकज घोलप यांनी मानले.

## जायनावाडी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

- माजी विद्यार्थी समिती संघाकडून शाळेसाठी सतरंजी तसेच शाळेसाठी बॅनर भेट

**एकदरे : (समर्थ गांवकरी)**




अकोले तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जायनावाडी तसेच ग्रामपंचायत कार्यालय जायनावाडी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मारुती भांगरे यांची निवड करण्यात आली.यावेळी ग्रामपंचायतचे ध्वजपूजन संदीप भांगरे यांनी केले. तसेच ग्रामविकास अधिकारी विशाल धांडे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.त्यानंतर शाळेचे ध्वजपूजन बाजीराव भांगरे यांनी केले.तर ध्वजारोहन शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष हरिदास भांगरे यांनी केले.त्यानंतर शाळेतील बालगोपाळांणी आपले मनोगत व्यक्त केले.प्रजासत्ताक दिनानिमित्त माजी विद्यार्थी समिती संघाकडून शाळेसाठी सतरंजी तसेच शाळेसाठी बॅनर देण्यात आले.यावेळी अध्यक्ष बाजीराव भांगरे,उपाध्यक्ष सोमनाथ भांगरे, सचिव ज्योती गवळी,कोशाध्यक्ष काळू भांगरे, सदस्य अमोल भांगरे,सचिन भांगरे,काळू डगळे, गोरख भांगरे,जगदीश सूर्यवंशी,गोरख भांगरे, रामदास भांगरे,सल्लागार सोमनाथ गोडे त्यानंतर नवनाथ भांगरे व हरिदास भांगरे यांच्याकडून शाळेसाठी पंखा व शालेय साहित्य देण्यात आले.शाळेच्या वतीने गुलाब पुष्प श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.याचे सर्वत्र कौतुक होत आहे.प्रमुख अतिथिनी आपल्या मनोगतातून भारतीय संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजून सांगताना विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात शिस्त व आदरयुक्त भावना जोपासली पाहिजे.याविषयी मार्गदर्शन केले. शाळेतील चिमुकल्यांनी अनेक देशभक्त क्रांतिकारक यांच्यावर भाषण केले यावेळी प्रभात फेरी,देशभक्ती कवायत,लेझिम पथक नृत्य शाळेतील मुलांनी सादर केले.तसेच बालविवाह मुक्त भारत करण्यासाठी विशेष प्रतिज्ञा घेण्यात आली.राष्ट्रपुरुषांच्या जीवनावर आधारित काही वक्त्यांनी बोलताना सांगितले की, कायदा,सुव्यवस्था,आपला न्याय हक्क प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार घटनेमध्ये दिला आहे.

यावेळी उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष मारुती भांगरे,ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी विशाल धांडे,संदीप भांगरे,माजी विद्यार्थी समितीचे अध्यक्ष बाजीराव भांगरे,शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष हरिदास भांगरे,उपाध्यक्ष काळू भांगरे,नवनाथ भांगरे,राजू भांगरे,गोरख भांगरे,तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती गवळी,अंगणवाडी सेविका व त्यांच्या मदतनीस ग्रामपंचायत कर्मचारी,शाळेतील विद्यार्थी गावातील ग्रामस्थ महिला मंडळी उपस्थित होते.

## हुल्लाबाई गाडेकर यांचं दुःखत निधन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



बिलोली तालुक्यातील मौ. कार्ला (खु) येथील सामाजिक कार्यकर्ते नागनाथ गाडेकर यांच्या मातोश्री जेष्ठ नागरिक हुल्लाबाई गंगाराम गाडेकर (75) दि. २८ जानेवारी रोजी पहाटे ५ च्या सुमारास दीर्घ आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुलं, सुना,नाती,नातवंड असा त्यांचा परिवार आहे, हुल्लाबाई ह्या मनमिळाऊ असल्यामुळे कार्ला गावात शोककळा पसरली होती. त्यांची अंत्यविधी (दि. २८) बुधवार सायंकाळी कार्ला ( खु) गावापासून २ किमी अंतरावर वव्याने स्थापन केलेल्या गट क्रमांक २७१ मधील स्मशान भूमीत करण्यात आले. यावेळी कार्ला ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते, नातेवाईकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## अजित पवारांच्या निधनाचे वृत्त समजताच कंधार बाजार पेठ बंद: कंधार शहरातील व्यापाऱ्यांनी घेतला निर्णय !

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

याबाबत सविस्तर वृत्त असे की राज्याची उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष कै. अजित पवार यांच्या अकाली अपघाती निधनाची बातमी सोशल मीडियाद्वारे कंधार सह तालुक्यातील गावागावात निधनाची बातमी समजताच गावातील सामाजिक कार्यकर्ते राजकीय नेत्यांनी एकत्र येऊन प्रथमतः उपमुख्यमंत्री कै.अजित पवार यांना आदरांजली वाहिली.

त्यांच्या कुटुंबीयांना या कठीण दुःखाच्या यातनेतून सावरण्याची शक्ती मिळण्यासाठी जागोजागी अन् अनेक गावागावात यांना प्रार्थना केली. शिवाय तालुक्यातील बाजारपेठ,खाजगी शाळा,कॉलेज अनेक प्रतिष्ठाने काल पूर्णपणे बंद करून, अजित पवारांना खऱ्या अर्थाने आदरांजली वाहून त्यांच्या दुःखात सामील होत




असल्याची भावना व्यक्त केली.

अजित पवारांच्या दुःखद निधनाच्या बातमीने त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांना व ग्रामीण सह शहरवासीयांना निधनाची वार्ता समजतात संपूर्ण कंधार परिसर शोक सागरात बुडाला. राजकारणातला दादा माणूस गेला अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. तर संगुचीवाडी येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसह शिक्षक व कंधार येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

## सरस्वती विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

सरस्वती विद्यालयात उदापुरला ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी दिमागदार मानवंदना राष्ट्रीय ध्वजास देऊन सर्वांची मने जिंकली सांघिक व साहित्य कवायत अतिशय सुंदर प्रात्यक्षिके मुलांनी सादर केली सदर प्रसंगी उदापूर गावचे सरपंच सचिन आंबेडकर उपसरपंच जयश्री अमूप,ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष संजय शिंदे.रोहिदास शिंदे विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे. श्रीराम ट्रस्टचे अध्यक्ष तुळशीराम शिंदे सचीव किशोर होनराव तसेच माजी सैनिक दलात्रय आरोटे,दिलीप आरोटे विविध संस्थांचे पदाधिकारी,माजी सैनिक 'माजी विद्यार्थी,देशप्रेमी नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते . या याप्रसंगी सरस्वती विद्यालयाच्या व जि प्राथ शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केली उपस्थितांना मुख्याध्यापक प्रतिक अकोलकर यांनी संदेश दिला १५ ऑगस्ट १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले परंतु देश वेगवेगळ्या संस्थानांमध्ये विभागलेला होता ही सर्व संस्थाने खालसा करून भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र बनवण्याच्या हालचालींना वेग आला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक देशांच्या लोकशाहीचा अभ्यास करून२६ नोव्हेंबर १९४९ रोजी एक मसुदा तयार केला आणि २६ जानेवारी १९५० पासून तो देशात अमलात आणण्यात आला. लोकांनी लोकांसाठी लोकांकरिता चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. आज आपल्या देशात विविध जाती धर्माचे लोक अतिशय गुण्या गोविंदाने राहत आहेत त्याचे सर्व श्रेय लोकशाहीला जाते.

# संस्कृती कनोरे विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

## मातृदेवो भव,आचार्य देवो भव याबरोबरच राष्ट्रप्रेम तितकेच महत्त्वाचे - राजेश परदेशी




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

स्नेहसंमेलनामूळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध गुण दर्शन कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे.तसेच अभ्यासासोबतच विविध उपक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळविला आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा दुरुपयोग टाळावा. मातृदेवो भव,आचार्य देवो भव याबरोबरच राष्ट्रप्रेम तितकेच महत्त्वाचे आहे.असे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल चे अध्यक्ष राजेश परदेशी यांनी केले आहे.

स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाचे श्री लक्ष्मीनारायण शिशु शिक्षण मंदिर संचलित संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष राजेश परदेशी, नगरसेवक गणेश कवडे, महेश लोंढे, दत्ता गाडळकर,संतोष गेनप्पा, संदीप दातरंगे,सौ.वैशालीताई नळकांडे, सौ.रुपाली दातरंगे, स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, कार्य. अध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे, खजिनदार गजेंद्र सोनवणे, सचिव विजय मानकर, शालेय शिक्षण समितीचे चेअरमन जितेंद्र लांडगे,व्हाईस चेअरमन श्रीमती मृणाल कनोरे, ऋत्विका कनोरे, आशुतोष शेळके,सचिव संजय सागांवकर, सचिन मडके, प्रविण झिंजे, किशोर विंचुरकर, योगेश पांढरपोटे, मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना भामरे, सौ.रोहिणी कर्डिले,जगन्नाथ कांबळे, सुशिलकुमार आंधळे, शिक्षक प्रतिनिधी सौ.विद्या रोहोकले, निरज चांगटे, बाबासाहेब वैद्य, विद्यार्थी प्रतिनिधी चि.यश नन्नवरे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कु.राधिका गवते आदींसह शिक्षक वृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.विक्रम पाठक म्हणाले, शाळेतील सर्व शिक्षक अत्यंत तळमळीने ज्ञानदानाचे कार्य करत असल्याने शाळेची प्रगती होत आहे.ज्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊन बक्षीसे मिळविले आहेत त्यांचे अभिनंदन.

गणेश कवडे म्हणाले,या शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असतात. यामुळेच अल्पावधीतच या शाळेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थी संख्या झाली आहे.कल्याण रोड येथे संस्कृती कनोरे प्रशाला नावारूपाला आली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोकधारा, भारुड, छावा नाटीका,गोरा कुंभार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संजय सांगावकर यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. प्रास्ताविक कल्पना भामरे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र गर्जे व चंदा कार्ले यांनी केले.तर आभार जगन्नाथ कांबळे यांनी मानले.

# आरोग्य ग्राम जखणगाव ता. जि. अहिल्यानगर करणार ग्रामस्थामार्फत पंचगव्याचे ब्रॅण्डिंग व मार्केटिंग

## जखणगाव ता जि अहिल्यानगर येथे हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली महाराष्ट्रातील पहिली एकदिवसीय गोपुराण कथा

- जखणगांव येथे आयोजित गोपुराण कथेत डॉ विकासानंदजी महाराजांच्या अमृत वाणीने मंत्रमुग्ध झाले हजारो भाविक




**जखणगांव : (समर्थ गांवकरी)**

आरोग्यदायी गाव म्हणून राज्यातच नव्हे तर जगभरात गाजत असलेल्या नगर जिल्ह्यातील जखणगाव येथे एकदिवसीय गो पुराण कथा नुकतीच संपन्न झाली. श्रीक्षेत्र पिंपळगाव वाघा येथील संत पिठाचे संस्थापक हरिभक्तीपरायण डॉ. विकासानंदजी महाराज मिसाळ यांच्या अमृतवाणीने महाराष्ट्रात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या एकदिवसीय गो पुराण कथेने सर्व भाविक मंत्रमुग्ध झाले. देशी गोवंश वाढावा,गोपालकांना गाईच्या संगोपनातून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ व्हावी व देशी गाय पालनाला प्रोत्साहन मिळावे या प्रांजळ हेतूने आरोग्य ग्राम जखणगाव येथील समस्त भाविकांच्या वतीने पंचक्रोशीतील सर्व गोपालकांच्या समुपदेशन व प्रबोधनासाठी या कथेचे हटकेश्वर सभागृहांमध्ये जखणगाव येथे आयोजन करण्यात आले होते. या एकदिवसीय कार्यक्रमाला जवळपासच्या 22 गावातील व अहिल्यानगर शहरातील हजारो भाविक भक्त उपस्थित होते. डॉ. विकासानंदजी महाराज यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण ही कथा सादर केली. आपल्या सादरीकरणात त्यांनी गावरान गाई पाळण्याचे पौराणिक, वैदिक, अध्यात्मिक,परमार्थिक, आरोग्य विषयक व व्यवहारिक महत्व विषद केले. सनातन धर्मामध्ये पूजापाठ व धर्मकार्याला विशेष महत्त्व असून प्रत्येक धर्म कार्यामध्ये पंचगव्यांचा वापर अनिवार्य आहे. परंतु आजकालच्या महागाईच्या काळात गावरान गाई पाळणे सामान्य शेतकऱ्यांसाठी अत्यंत खर्चिक व तोट्यात घेऊन जाणारा व्यवहार आहे. त्यामुळे शहरांत शुद्ध पंचगव्य सहजासहजी उपलब्ध होतं नाही किंबहुना अनेक भाविकांची याबाबतीत फसवणूक होते. परंतु शुद्धतेची व प्रामाणिक संकलनाची हमी दिल्यास गाईचे गोमूत्र, गोमय, गोवऱ्या, गोदुग्ध,गोदही, गोघृत, गो नवनीत,गोतक्र व गोधूम असे विविध पदार्थ कौटुंबिक वापरासाठी व धर्म कार्यामध्ये वापरण्यासाठी जर गावाने एकत्र येऊन भूदेवांच्या मार्फत यजमानांपर्यंत पोहोचवण्यासाठी सहकार्य केल्यास प्रचंड प्रमाणात अर्थसहाय्य सामान्य गोपालकाला प्राप्त होऊ शकेल व तो शेतकरी आर्थिक संकटाला स्वावलंबनाने सामना करणेस सज्ज होईल. असा सल्ला विकासानंद महाराजांनी यावेळी आयोजकांना दिला.त्यांच्या या सूचनेचे पालन करून जखणगाव मधील सर्व कारभाऱ्यांनी एकत्र येऊन अशा प्रकारे देशी गाई पाळणाऱ्या शेतकऱ्यांच्या कडून पंचगव्य संकलन केंद्र लवकरच सुरु करून ते योग्य पद्धतीने वितरण करण्याचा संकल्प या कार्यक्रमाच्या वेळी करण्यात आला. सखोल अभ्यास, मृदुभाष्य व उत्कृष्ट विषय मांडणी यामुळे अत्यंत शांततेत व आत्मीयतेने सुमारे अडीच तास सर्व भाविकांनी कथेचे मनःपूर्वक श्रवण केले. जखणगावच्या या उपक्रमास संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी उपस्थित असणारे अहिल्यानगर महापालिकेचे नवनिर्वाचित सदस्य श्री ऋग्वेद भैय्यासाहेब गंधे यांनी दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संत पीठ व जखणगाव मधील सर्व भाविक भक्तांनी विशेष प्रयत्न केले. या कथेतून नक्कीच समाजात विशेषतः गोपालनावर सकारात्मक परिणाम होतील असा विश्वास यावेळी आरोग्य ग्राम जखणगावचे सरपंच डॉ. सुनील दिगंबर गंधे यांनी यावेळी व्यक्त केला.

# चिल्हेवाडीत मतदान जनजागृती

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी मतदान गुरूवार दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ असुन सर्व मतदार बंधू भगिनी यांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा.यासाठी आज चिल्हेवाडी शाळेतील बालचमूनी प्रभातफेरी काढून जनजागृती केली. ढोलाच्या गजरात घोषणा देत सर्व मुलांनी मतदारांना मतदान करण्याचे आव्हान केले.

चला मतदान करूया, देशात लोकशाही रुजवूया. मतदान करा ५ फेब्रुवारीला मतदान करा या घोषणा देण्यात आल्या.

आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरेचे जतन करू आणि मुक्त, निःपक्ष व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकीचे पावित्र्य राखू.निवडणुकीत निर्भयपणे तथा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू अशी यावेळी शपथ घेण्यात आली याप्रसंगी जीवन मुंढे,राजेंद्र भोईर, हरीभाऊ भोईर,महादू भोईर,शुभम भोईर,लक्ष्मी भोईर, लता भोईर,जाईबाई तातळे,जयश्री भोईर उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक प्रभाकर दिघे व उपशिक्षक जनार्दन केदारी यांनी केले.

# अभिनव गेट टुगेदर

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

होय! कालच्या 26 जानेवारीच्या पूर्व संध्येची दुपारही पवित्र होती, प्रसन्न होती, उत्साही होती. मॉडर्न हायस्कूल अकोले या विद्यालयाचे 1976 या दहावीचे महाराष्ट्रभर विखुरलेली तत्कालीन विद्यार्थी की ज्यांची वय आज 65 ते 70 वर्षे या रेंज मधील होती, असे सुमारे 35 मुले व आठ मुली यांचे एक मंगल, श्रीमंत व पवित्र असा दोन दिवसांचा भरगच्च सोहळा अकोल्याच्या रविराज या हॉटेलमध्ये पार पडला. यात अनेक उच्चपदस्थ पद भूषवलेली निवृत्त अधिकारी, लेखक, कवी यांचा समावेश होता हे विशेष!

25 जानेवारीला अकरा वाजता रविराज हॉटेलमध्ये त्यांच्या मेळावा झाला. त्याचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे तत्कालीन शिक्षक, लेखक व पत्रकार शांताराम गजे होते. सुरुवातीला प्रत्येकाने आपली ओळख करून दिलेली, ती ऐकूण गजे यांनी सांगितले की, गुरु हा नेहमी 'शिष्यात इच्छेत पराजयम' याच एकमेव भूमिकेत असतो. या बहुतांश तत्कालीन विद्यार्थ्यांनी 'माझा पराभव' केल्याचे त्यांनी नमूद करून त्यांना धन्यवाद दिले. सु. प. देशमुख या तत्कालीन उपस्थित शिक्षकांने सर्व विद्यार्थ्यांना आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे विद्यालयाचे तत्कालीन चतुर्थ श्रेणी कर्मचारी चंदन वस्ताद वय 90 वर्षे हेही उपस्थित होते. या प्रसंगी तत्कालीन विद्यार्थ्यांपैकी इंजिनियर रामनाथ आरोटे, रवींद्र देशमुख, प्राचार्य डॉ. चंद्रकांत मंडलिक, डॉ. दत्तात्रय जुन्नरकर, वरिष्ठ प्राध्यापक डॉ. रंगनाथ दातखिळे, संचालक पर्वत नाईकवाडी, अकोले पंचायत समितीच्या माजी सभापती आशा पापळ, शासकीय दुग्ध प्रकल्पातील अधिकारी ज्ञानोबा वाकचौरे, अतुल भिडे, श्रीमती राठी या उच्चपदस्थांसह आदी उपस्थित होते. त्या सर्वांनी आपले मनोगत व्यक्त करून जीवनातील यशाबद्दल गुरुजनाबाबत कृतज्ञता व्यक्त केली आहे.



या कार्यक्रमानंतर त्याच स्टेजवर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात रवींद्र देशमुख, ज्योती राठी, अरुण मुळे, सुरेखा जोशी यांनी उर्वरित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. दुसऱ्या दिवशी ही सर्व माजी विद्यार्थी आपल्या माजी विद्यालयात प्रजासत्ताक दिनाला उपस्थित राहिली. विद्यालयाने इंजिनिअर रामनाथ आरोटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून संस्थेने या माजींचा आदर केला. त्यानंतर त्यांनी भंडाऱ्याला भेट दिली. कळसुबाई, रतनगड, अमृतेश्वर मंदिर, घाटघर या कोकणकडा, सांदणदरी या स्थळांचे याची देही याची डोळा दर्शन करून ही सर्व पाखरे आपल्या गावाकडे रात्री उशिरा रवाना झाली.

# उत्तम सदाकाळ यांचा राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**


राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी राज्यातील सर्व शिक्षक,अधिकारी यांचेसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी रत्नागिरी येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत कोल्हापूर,पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर,नागपूर, लातूर,नाशिक,अमरावती या आठ विभागातील एकूण छत्तीस जिल्ह्यातील स्पर्धकां नी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करंजाळे,केंद्र- मढ, ता:-जुन्नर या शाळेतील पदवीधर शिक्षक उत्तम निवृत्ती सदाकाळ यांनी "नीलगाईच्या शोधात..."हा लेख लिहून 'प्रवास वर्णन लेखन' स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक मिळविला. उत्तम सदाकाळ यांनी या यशामुळे करंजाळे गावाचे, जुन्नर तालुक्याचे व पुणे विभागाचे नाव उंचावल्याने त्यांचे विविध स्तरातून कौतुक होत आहे. महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार, पुणे जिल्हा परिषदेचा गुणवंत शिक्षक पुरस्कार तसेच अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानीत असणाऱ्या उत्तम सदाकाळ यांची 'पाऊस' कविता इयत्ता दुसरी च्या अभ्यासक्रमात समाविष्ट असून त्यांचा 'कमाई' बालकथा संग्रह शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे यांनी इयत्ता चौथी ते पाचवीच्या मुलांसाठी समग्र शिक्षा तर्फे प्रकाशित केलेला आहे. उत्तम सदाकाळ यांनी "नीलगाईच्या शोधात" या प्रवास वर्णनात आजोबा गडावरील रोमांचक सफरीचे वर्णन केले आहे. नीलगाई बघण्यासाठी आजोबागड येथे गेलेल्या उत्तम सदाकाळ व त्यांच्या मित्रांना या प्रवासा दरम्यान आलेले रोमहर्षक व सुरस अनुभव अतिशय सुंदर रीतीने लिहून उत्तम सदाकाळ यांनी या स्पर्धेत बाजी मारली.प्रवास वर्णन लेखन स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत लवकरच सन्मान चिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे.



### अजित पवारांच्या निधनाने वृत्त कळताच अकोले व राजुर व संपूर्ण तालुक्यात कडकडीत बंद

# संपूर्ण तालुका शोक सागरात बुडाला

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाने अकोले तालुक्याचे अपरीनीत नुकसान झाले आहे. अकोले तालुक्याच्या विकासामध्ये अजित दादा पवार यांचा मोठा वाटा होता अशी भावना अकोले येथील बाजार तळासमोर झालेल्या श्रद्धांजली सभेत अनेक वक्त्यांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा विमान अपघातात बारामती येथे दुर्दैवी निधन झाल्याची बातमी समजताच अकोले तालुक्यावर शोककळा पसरली.या पार्श्वभूमीवर अकोले शहरातील सर्व छोटी मोठी दुकाने स्वयंस्फुर्तीने बंद ठेऊन अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. व अकोले येथील बाजार तळासमोर तहसील कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याचे कडेला सर्वपक्षीय कार्यकर्ते व शहरातील व्यापारी यांनी एकत्रित येत श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार व राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष स्व. मधुकरराव पिचड यांच्यासह अकोले तालुक्यावर अतोनात प्रेम केले. जणू हा तालुकाच पवार कुटुंबीयांनी दत्तक घेतल्याचे अकोले तालुक्यात झालेल्या विकास कामातून दिसते. माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे निळवंडे धरण, अगस्ति कारखान्याचे चेअरमन व जिल्हा बँकेचे माजी चेअरमन सीताराम पाटील गायकर यांच्या मुळे तालुक्यातील मुळा परिसरात झालेले पिंपळगाव खांड धरण यासारखे जलसंधारणाची अनेक छोटे मोठी कामे तालुक्यात अजित दादा पवार यांच्या मुळे मार्गी लागली. स्व.मधुकरराव पिचड यांच्या निधनानंतर आमदार डॉ किरण लहामटे ,माजी आमदार वैभवराव पिचड, ज्येष्ठ नेते सीताराम पाटील गायकर, जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे आदींचा त्यांच्याशी थेट संबंध होता. अगस्ती कारखान्याची निर्मिती ते गत एक ते दीड वर्षापूर्वी अगस्ती कारखान्याला केंद्र सरकारकडून राज्य सरकारच्या शिफारशीवर झालेला ९४ कोटी रुपयांचा कर्ज पुरवठा यामध्ये अजित दादा पवार यांची महत्वाची भूमिका होती. आमदार डॉ.किरण लहामटे आमदार झाल्यानंतर शरद पवार व नंतरच्या काळात अजित पवार यांनी तालुक्यातील विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी देऊन त्यामाध्यमातून अनेक छोटी मोठी विकासकाने मार्गी लागू शकली.तालुक्यातील लिंगदेव येथील एम आय डी सी, अकोले येथील उपजिल्हा रुग्णालय, अकोले बसस्थानक, अकोले बाजार तळ आदी कामे त्याची साक्ष देत आहेत.

अनेक विकास कामांची भूमिपूजने, उद्घाटने, लोकार्पण सोहळे, राजकीय सभा यानिमित्ताने अजितदादा पवार अकोले तालुक्यात वेळोवेळी आले. शरद पवार यांच्या प्रमानेच कार्यकर्त्यांवर निस्सिम प्रेम करणारे व नावासह ओळखणारे अजित दादा पवार यांचे व्यक्तिमत्व होते. तालुक्यातील बारीक सारीक कामात त्यांचे लक्ष होते. यावेळी राष्ट्रवादी किसान सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड वसंतराव मनकर, अगस्ती कारखान्याचे संचालक परबत नाईकवाडी, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख महेशराव नवले व मारुती मेंगाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद चौधरी, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव नेहे,भाजपचे अकोले मंडलाध्यक्ष राहुल देशमुख व कोतुळ मंडलाध्यक्ष बाळासाहेब सावंत, आर पी आय चे नेते शांताराम संगारे, बाजार समितीचे सभापती भानुदास तिकांडे, ज्येष्ठ नेते जे डी आंबरे पाटील आदींनी त्यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. सूत्रसंचालन संदीप शेनकर यांनी केले . माजी नगरसेवक प्रमोद मंडलिक यांनी पसायदान म्हणून सभेचा शेवट केला. यावेळी जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, अगस्ती पतसंस्थेचे माजी चेअरमन बाळासाहेब भोर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष सुरेश गडाख,अगस्ती कारखान्याचे संचालक अशोक आरोटे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रकाश नाईकवाडी, व्हा. चेअरमन साईनाथ नवले, डॉ. मनोज मोरे, उपनगराध्यक्ष शरद नवले, नगरसेवक आरिफ शेख, नवनाथ शेटे, सागर चौधरी, मनसेचे तालुकाध्यक्ष दत्ता नवले, व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष विनायक धुमाळ, अनिल कोळपकर, परशुराम शेळके,अमोल वैद्य, भाऊसाहेब नाईकवाडी, गणेश कानवडे, हिम्मत मोहिते आदी सर्वपक्षीय कार्यकर्ते, व्यापारी, नागरिक उपस्थित होते.

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर.✆:०२४१-२३२६९१४

**जा. क्र. पतसंस्था फेडरेशन /६०५६/ सन २०२६** **दिनांक -१९/०१/२०२६**

### स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.जामखेड,ता.जामखेड,जि.अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अ.नगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण / दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार,गहाण,दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द / निरर्थक ठरतील.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत: वसुली दा.रक्कम | गट नं./प्लॉट नं./मिळकत नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | चतु:सिमा (पुर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज - विलास संजय मोरे यांची मिळकत व करिता | जामखेड | १७३१६३४/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११६५/२ पैकी | ८.००.००पैकी | ८०.०० | |
| | जामि - मुबारक महंमद सय्यद यांची मिळकत | रत्नापुर<br>रत्नापुर | | ५७/१<br>५७२ | ०.४०.००<br>०.९१.०० | १.२६<br>२.०८ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि- निखील रविंद्र तेरकर यांची मिळकत | आघी | | २८० | ०.०८.०० | १.१४ | |
| | जामि - योगिता विलास मोरे | खोडे नगर ता.जामखेड | | | | | |
| २ | कर्ज - सागर बाबासाहेब म्हेत्रे यांची मिळकत व करिता | जामखेड | ११०१०६/- +इतरखर्च+ होणार व्याज | ७०९ पैकी | ०.५४ पैकी | ०.९७ | |
| | जामि - शंकर सखाराम मैंदड यांची मिळकत | जामखेड | | ८१२/१ पैकी | ०.३८.०० पैकी | ०.६३ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - ईश्वर बाबासाहेब म्हेत्रे यांची मिळकत | जामखेड ता.जामखेड | | ७०९ पैकी | ०.५४ पैकी | ०.९७ | |
| ३. | कर्ज - निता झुंबरबाई खवळे यांची मिळकत | जामखेड<br>जामखेड | १०९१४९९/- +इतरखर्च+ होणार व्याज | १०९४/५<br>१०९४/५ | ०.०१.०४<br>०.०१.०६ | ०.०१<br>०.०२ | |
| | जामि - दत्तात्रय हरिदास जगताप यांची मिळकत | जामखेड | | ५२० | १.०८.०० | १.९४ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - संतोष सुदाम जाधव यांची मिळकत | जामखेड ता.जामखेड | | ११२४ | ०.०१.०० | ०.०१ | |
| ४. | कर्ज - जयदत्त सदाशिव कात्रजकर यांची मिळकत व करिता | कुसडगाव<br>कुसडगाव<br>कुसडगाव | ३२६१६०/- +इतरखर्च+ होणार व्याज | ५४<br>५७<br>६० | ०.२१.००<br>०.२०.००<br>०.००.१६ | ०.१२<br>०.०९ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - सिध्देश्वर आण्णा कार्ले यांची मिळकत | कुसडगाव | | ५१२ | ०.९१.०० | २.२६ | |
| | जामि - छगन बुआसाहेब कात्रजकर | कुसडगाव ता.जामखेड | | | | | |
| ५ | कर्ज - विकास त्रिंबक पांढरे यांची मिळकत व करिता | जामखेड | १७७९३८२/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११४५/१ | २.३८.०० | २३.८० | |
| | जामि - दत्तात्रय श्रीराम वारे यांची मिळकत | रत्नापुर | | ६६ पैकी | ४.३२.०० पैकी | २.२८ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | गहाणदार - नितीन त्रिंबक पांढरे यांची मिळकत | जामखेड ता.जामखेड | | ११४५/१ | २.३८.०० | २३.८० | |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर
दिनांक -१९/०१/२०२६

सिल

सही
(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह.
फेडरेशन मर्या,अ.नगर

# नगरसेवकांना गुंडाशी मैत्री महागात पडणार ; सुजय विखेंचा रौद्रावतार!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर जिल्ह्यातील ड्रग्ज माफीयावरून राजकारण तापलं आहे. खासदार नीलेश लंके आणि माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्यात वॉर रंगला आहे. एकमेकांचे कार्यकर्ते, नेते कसे ड्रग्ज तस्कारांबरोबर फिरतात, याचे फोटो व्हायरल करत आहेत. यातून ड्रग्ज माफीयांचे राजकीय संबंधांची चर्चा सुरू आहेत.

विखे अन् लंके एकमेकांच्या बालेकिल्ल्यातील गुन्हेगारीकडे देखील बोट दाखवत आहे. यातून आता शिर्डीतील गुन्हेगारांबरोबर राहण्यावरून



सुजय विखे पाटलांनी आपल्या नगरसेवकांना तडाखेबंद इशारा दिला आहे. गुंडांबरोबर दिसला, ते खपवून घेणार नाही, असे नगरसेवकांना सुनावताना, सुजय विखे पाटील यांनी म्हटले आहे.

सुजय विखे पाटील शिर्डी दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांना कार्यकर्त्यांशी संवाद साधताना, शिर्डीतील गुंडगिरीवर निशाणा साधला. तसंच शिर्डीतील विकासासाठी सर्व पक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र यावं, असं आव्हान केलं. ते म्हणाले, "शिर्डीच्या विकासासाठी एकत्र यावं. पण समोरचा चाकू मारताना, विचार करणार नाही की, हा भाजपचा गोंदकर आहे की, सेनेचा गोंदकर? शरद पवार राष्ट्रवादी पक्षाचा कोते आहे की, कमळाचा कोते? तो चाकू मारणारच! या गुन्हेगारांविरोधात सर्व पक्षीयांनी एक मूठ करावी."'मी एक व्हिडिओ पाहिला. एक आरोपी सुटला. गाडीमध्ये येतो. काही तरी, व्हिडिओचा तमाशा केला. फक्त दोन दिवस द्या, या सर्वांचा कपडे काढूनच शिर्डीत वरात काढतो. हा सुजय विखेंचा शब्द. हा तमाशा, थांबवा. शिर्डीला आव्हान आहे, कार्यकर्ता कोणाचाही असो, पण जर गुंडगर्दी, गुन्हेगारांबरोबर दिसलात. आता टॉलेरेस्ट लेव्हल नाही. सर्व नगरसेवकांची जबाबदारी आहे,' असे ठणकावून सुजय विखे पाटील यांनी सांगितले.



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांचे विमान अपघात निधन झाल्यामुळे अर्धापूरातील व्यापाऱ्यांनी प्रतिष्ठाने बंद ठेवून सर्वपक्षीय श्रध्दांजली अर्पण करण्यात आली यावेळी पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...

### एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांविरूध्द गुन्हा दाखल



अहिल्यानगर (स. गांवकरी) : मनमाड रस्त्यावरील विळद (ता. अहिल्यानगर) शिवारातील नर्सरी जवळ वाहनाचा कट लागल्याच्या कारणावरून व्यावसायिकाला लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांविरूध्द गुन्हा नोंदवण्यात आला आहे. व्यावसायिक बाळासाहेब सुरेशराव जगताप (वय-५९) यांनी फिर्याद दिली आहे. सोमवारी (दि.२६ जानेवारी) सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास ही घटना घडली. सचिन बाबासाहेब गिते (रा. धारवाडी, ता. पाथर्डी), महादेव किसन बडे (रा. जागेवाडी, ता. पाथर्डी), संजय परसराम पवार (रा. पारगाव, ता. शिरूर कासार, जि. बीड) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. वाहनाचा कट लागल्याच्या कारणावरून सचिन गिते व महादेव बडे यांनी जगताप यांना अडवले. त्यानंतर त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत मारहाण केली.याच दरम्यान त्या ठिकाणी खासगी बसचा चालक संजय पवार हा देखील आला. या तिन्ही संशयित आरोपींनी संगनमत करून फिर्यादी जगताप यांना जमिनीवर पाडले आणि लाकडी दांडक्याने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. इतकेच नव्हे तर, तुला गाडीखाली घालून ठार मारू अशी धमकीही आरोपींनी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेत बाळासाहेब जगताप जखमी झाले असून, त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तिघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार थोरात करीत आहेत.

### पोलिसांचा वरदहस्त की उत्पादन शुल्क विभागाचे गुन्हेगारी दुर्लक्ष?

इगतपुरी (स. गांवकरी) : घोटी शहरासह इगतपुरी तालुक्यात विषारी ताडी विक्रीचे अवैध साम्राज्य उभे राहिले असून, या धोकादायक व्यवसायामुळे हजारो तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या बेकायदेशीर ताडी विक्री केंद्रांवर कारवाई न होणे म्हणजे स्थानिक पोलीस आणि उत्पादन शुल्क विभाग यांचा थेट वरदहस्त असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे. इगतपुरी शहरापासून घोटी–सिन्नर महामार्गापर्यंत तसेच वैतरणा, टाकेद परिसरात सर्रासपणे विषारी ताडीची खुलेआम विक्री सुरू आहे. दररोज हजारो लिटर घातक रसायनमिश्रित ताडी विकली जात असून, या अवैध धंद्यामुळे परिसरातील तरुण पिढी व्यसनाच्या आहारी गेली आहे. अनेक कुटुंब उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असून महिलावर्ग भीतीच्या छायेखाली जगत आहे. वारंवार तक्रारी करूनही घोटी पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. "हे अवैध ताडी विक्री केंद्र तात्काळ बंद करा" अशी आक्रमक मागणी महिला वर्गाकडून केली जात आहे.

### समृद्धी शिंदे जिल्हास्तरावर विज्ञान प्रदर्शनात सर्वप्रथम

तामसा (स. गांवकरी) : दिनांक २३ जानेवारी नांदेड येथील ग्रामीण पॉलीटेक्निक कॉलेज विष्णुपुरी या ठिकाणी पार पडलेल्या जिल्हा विज्ञान प्रदर्शनात जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील विद्यार्थ्यांनी आपल्या प्रयोगासह सहभाग नोंदीला होता. पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसाची विद्यार्थिनी कुमारी समृद्धी गणेश शिंदे हिने परीक्षकांच्या प्रत्येक प्रश्नांना अतिशय समाधानकारक उत्तर दिल्यामुळे तिच्या एक्वा पोनिक फार्मिंग या प्रयोगाला माध्यमिक गटातून सर्वप्रथम क्रमांक देण्यात आला. येत्या 28 तारखेला होणाऱ्या नागपूर येथील पाच दिवशी य वीज्ञान प्रदर्शनत तिची नांदेड जिल्ह्यातून निवड झाली आहे. नांदेडचे शिक्षणाधिकारी सलगर यांच्या हस्ते तिला ट्रॉफी व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या प्रयोगासाठी तिला शाळेतील जीपी तावडे,आर के रापतवार, सविता पाटील,स्मिता ठाकूरवाड, विश्वनाथ कोलगिरे,श्रीकांत मुकनवार यांचे मार्गदर्शन लाभले. प्रजासत्ताक दिनानिमित्त आलेल्या मान्यवरांच्या हस्ते तिचा शाळेत सत्कार करण्यात आला व तिला राज्यस्तरासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ती निर्मला ठाकूर, माजी उपसभापती शंकर मेंडके, शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य उपस्थित होते.


### तरुण इंजिनियरची गळफास घेऊन आत्महत्या; लोहा येथील घटना

तामसा (स. गांवकरी) : हदगांव तालुक्यातील लोहा (मांडवा)येथे सुरु असलेल्या रोड च्या कामात साईड इंजिनियर च्या कामावर कार्यरत असलेल्या तरुण इंजिनियर नी आपल्या राहतया घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. विस्तृत माहिती नुसार हदगांव तालुक्यातील लोहा (मांडवा)येथे गणेश इंटरप्राईजेस नांदेड च्या कंपनी ने लोहा पाटी ते जांभळी (भोकर) चोपदरी रोड चा काम सुरु असून या कामावर कार्यरत असलेल्या नुकूल सुभाष सागर (26) रा. दारव्हा जि यवतमाळ हा तरुण साईड इंजिनियर कंपनी च्या कामावर मागील 6 महिन्यापासून कार्यरत होता सदर तरुण लोहा गावात साहेबराव गायकवाड यांच्या घरात किरायाने वास्तव करत होता दिनांक 26 जानेवारी ला नुकूल कामावर आला नाही मनहून त्याचा रूम वर जाऊन पाहिल्यावर त्यांनी बेडशीट गळ्यात बांधून सलेब च्या लोखंडी हुकाला लटकून आत्महत्या केल्यास निदर्शनास आल्यावर घटनेची माहिती तामसा पोलीस ला काळिवली.

## मेहेरबाबाच्या ३ दिवसीय अमरतिथी सोहळास दि. ३० रोजी प्रारंभ

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील अरणगाव रोडवरील मेहेराबाद येथे अवतार मेहेरबाबा यांच्या समाधीस्थळी ५७ वी अमरतिथी (पुण्यतिथी)सोहळा दि.३० जाने.ते १ फेब्रुवारी २६पर्यंत होणार असून यासाठी देशातून सुमारे लाखाच्यावर व परदेशातून सुमारे ५०० बाबाप्रेमी, भाविक येतील अशी माहिती विश्वस्त मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली.



मेहेरबाबांचे असंख्य भक्त जगात असून असंख्य केंद्रेही आहेत.सर्व जाती धर्मातील लोकांना मानवतेचा व सत्याचा संदेश देत त्यांनी जगभर प्रवास केला जगात मी कोठेही देह सोडला तरी मेहेरावाद येथे बांधलेल्या समाधीत मला समाधीस्त करावे असे त्यांनी सांगून ठेवले होते ३१ जाने १९६९ रोजी त्यांचे महानिर्वाण झाले. म्हणून या ठिकाणी अमरतिथी सोहळ्यासाठी लाखो भाविक येत असतात. याबाबत अधिक माहिती देताना चेअरमन फॉमरोज मिस्री म्हणाले दि.३०जाने.रोजी सकाळी १० वा बाबांची प्रार्थना,आरतीने कार्यक्रमास प्रारंभ होईल.नंतर रात्री १२ वाजेपर्यंत फिल्म शो,तसेच विविध केंद्रावरुन आलेले लोक भजने म्हणतील, दि.३१ रोजी सकाळी ७ वा आरती प्रार्थना होईल व कार्यक्रम सुरु होईल सकाळी ११ वाजता चेअरमन फॉमरोज मिस्री यांचे व्याख्यान होईल,त्यानंतर मेहेर धून म्हटली जाईल.बाबानी देहत्याग केला त्यावेळी दुपारी १२ वाजता १५ मिनिटे मौन पाळले जाईल व नंतर सर्व भाषांमधून आरती प्रार्थना होईल.नंतर लगेच कार्यक्रम सुरु होईल तो रात्री१२ वा पर्यंत लोक भजने बाबावरील सांस्कृतीक व नृत्याचा कार्यक्रम,नाटक,गजल, इ. कार्यक्रम सादर करतील.

दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वा कार्यक्रम सुरु होईल व दु.१ वाजता आरती, प्रार्थना होऊन कार्यक्रमाची सांगता होईल. दर्शनासाठी भाविकांना नंबर दिले जात असल्याने त्याप्रमाणे रांग लागते.त्यामुळे गडबड गोंधळ होण्याचा प्रसंग येत नाही.संपूर्ण शांततेत शिस्तबध्द पध्दतीने हा उत्सव संपन्न होतो.ट्रस्टच्या वतीने सध्या कार्यक्रमासाठी भव्य असा मंडपाची उभारणी चालू असून येणा-या भाविका साठी स्त्री व पुरुषांसाठी मोठे तंबू उभारण्याचे काम चालू असून त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी,संडास बाथरुमची सोय, आरोग्य सेवा या सेवा उपलब्ध राहणार असून येथे सुमारे ४० हजार भाविक राहतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे.तर रेल्वेस्टेशन व बसस्थानक येथून भाविकांच्या सोयी साठी समाधी स्थळापर्यंत बसेस ची सोय आहे. हजारो युवक स्वयंसेवकांचे काम करीत आहे.

## आ. काशिनाथ दाते यांनी अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल केला तीव्र शोक व्यक्त!

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या राजकारणात व समाजकारणात परीसासारखा प्रभाव टाकणारा, सर्वसामान्यांचा असामान्य नेता अचानक आपल्यातून निघून जाणे ही मन सुन्न करणारी घटना असल्याची भावना पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. "जबरदस्त पकड असलेले, शब्दाचे पक्के आणि निर्णयक्षम नेतृत्व असलेले दादा लोकप्रियतेच्या शिखरावर असताना काळाने हिरावून नेले. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला आमदार होण्याची संधी केवळ आणि केवळ अजितदादांमुळेच मिळाली. असा नेता पुन्हा होणे अशक्य आहे,"



अशा शब्दांत आमदार दाते यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा खरा तारणहार, राज्यातील तमाम बहिणींचा लाडका भाऊ, साखर उद्योगाला शिस्त लावणारा आणि राज्याला औद्योगिक प्रगतीच्या मार्गावर नेणारा अष्टपैलू नेता आज हरपला असल्याचे त्यांनी सांगितले. "दादा तुम्ही नसल्याने समोर सर्व काही अंधारमय झाल्यासारखे वाटत आहे. महाराष्ट्राने एक खंबीर, धाडसी आणि दूरदृष्टीसंपन्न नेतृत्व गमावले आहे," अशा शब्दांत त्यांनी आपल्या श्रद्धांजलीचा समारोप केला.

## अॅड. देशमुख महाविद्यालयात राज्यस्तरीय वादविवाद व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन



कै.डॉ. माधवराव दिगंबर उमराणी स्मृतिचषक
राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा



कै.होनाजी तुकाराम कोंडार स्मृतिचषक
राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील सत्यनिकेतन संस्थेचे अॅड. एम. एन.देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर, जिल्हा अहिल्यानगर येथे दि. 29 जानेवारी 2026 रोजी कै. होनाजी तुकाराम कोंडार स्मृतीचषक राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा आणि दि. 30 जानेवारी 2026 रोजी कै. डॉ. माधवराव दिगंबर उमराणी स्मृतीचषक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या आहेत. या स्पर्धांचे उद्घाटन 29 जानेवारी 20 26 रोजी स. 10 वाजता राहुल देशमुख, (माजी प्राचार्य, श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय संगमनेर) यांचे शुभहस्ते होणार आहे. यावेळी मिलिंद उमराणी (संचालक, सत्यनिकेतन संस्था राजूर) हे अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. प्रमुख मान्यवरांमध्ये एम. एल. मुठे (सचिव, सत्यनिकेतन संस्था, राजूर), डॉ. किरण उमराणी, श्रीमती मंगलताई कोंडार आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयातील वादविवाद व वक्तृत्व विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. टी. करंडे यांच्या मार्गदर्शनाखाली केले जात आहे. वादविवाद स्पर्धेचा विषय 'शिक्षणाचे खाजगीकरण शैक्षणिक विकासास पूरक आहे कि नाही' असा आहे तर वक्तृत्व स्पर्धेचे विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 : एक चिंतन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), संत तुकारामांचा वैज्ञानिक दृष्टिकोन असे आहेत. या स्पर्धेमध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील संघ सहभागी होऊ शकतील. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बी. वाय. देशमुख आणि संयोजन समितीने या स्पर्धांमध्ये संघांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## युवकांनी सामाजिक बांधिलकी जपावी : सरपंच प्रतीक शेळके

### विखे पाटील फौंडेशनतर्फे हिवाळी श्रमदान शिबिराचा अकोळनेरला शुभारंभ

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

येथील विळद घाट मधील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कॉलेज ऑफ फार्मसी व आय. बी. एम. आर. डी.अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर अकोळनेर येथे आयोजित करण्यात आले.




या शिबिराचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला या प्रसंगी सरपंच श्री.प्रतीक दादा शेळके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उपसरपंच श्री.संदीप जाधव, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती श्री. भाऊसाहेब भोर, तंटामुक्ती अध्यक्ष श्री.रमेश जाधव, ग्रामसेवक श्री. प्रविण पवार उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे श्री.प्रतिक दादा शेळके यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांनी सामाजिक बांधीलकी जपावी, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्रिय सहभाग घ्यावा,तसेच जलसंधारण व पर्यावरण संवर्धनासारख्या उपक्रमांमध्ये पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. युवकच देशाच्या शाश्वत विकासाचा मजबूत पाया असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.रविंद्र नवधर,औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय.पवार आम. बी. एम. आर. डी. चे डायरेक्टर डॉ.संजय धर्माधिकारी यांचे शिबीरासाठी विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी अभियांत्रिकीचे प्रा. मंदार बिडवे, औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे डॉ. निलेश म्हस्के व आय. बी. एम. आर. डी.चे डॉ.एम.पी. शर्मा यांनी केले.

तसेच शिक्षक समन्वयक प्रा. डॉ. माधवी नेरकर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. समशेर शेख, प्रा. नाना मुळीक, डॉ. अनिकेत विले, प्रा गणेश डहाणे, प्रा. दत्ता ठाणगे, प्रा. रेणुका देवराय, प्रा. निलेश पोंधे, श्री. रविंद्र शेलार, प्रा. एम.ए.रासकर, प्रा.एस.आर. बिडवे यांनी शिबीरासाठी परिश्रम घेतले.

"जलसंधारण व ओसाड जमिनीच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करून शाश्वत विकासासाठी युवकांची भूमिका या विषयावर आधारित या शिबिरात ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, जलसंधारण तसेच सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे.

या कार्यक्रमाचे डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन चे टेक्निकल डायरेक्टर प्रा. सुनील कल्हापुरे, सेक्रेटरी जनरल डॉ.पी. एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील,नामदार तथा अहिल्या नगरचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.

## गणोरे ग्रामसभेत कुक्कुटपालन प्रदूषण व रस्ता कॉँक्रिटीकरणावरून प्रचंड गोंधळ!

**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील गणोरे येथे पार पडलेल्या ग्रामसभेत शिंदेवाडी ते खतोडेवाडी रस्ता कॉंक्रिटीकरण तसेच कुक्कुटपालन व्यवसायामुळे होत असलेल्या प्रदूषणाच्या मुद्द्यावरून चांगलाच गोंधळ उडाला. कुक्कुटपालन व्यवसाय सुरू करताना आवश्यक असलेले शासकीय नियम व निकष डावलून परवानगी देण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केल्याने वातावरण तणावपूर्ण बनले. ग्रामस्थांनी सरपंचांना धारेवर धरत तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी सभेत खडाजंगी होऊन ग्रामस्थ आक्रमक झाल्याचे चित्र दिसून आले.

या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच संतोष आंबरे होते.




ग्रामविकास अधिकारी अनुपस्थित असल्याने सचिव म्हणून मुख्याध्यापक अशोक नेहरकर यांनी काम पाहिले.

"जनतेच्या भावना लक्षात घेऊन जोपर्यंत पोल्ट्री धारक एसी पोल्ट्री उभारून ग्रामस्थांना त्रास होणार नाही याची खात्री देत नाही, तोपर्यंत पुढील पक्ष्यांचा लॉट आणू नये, असे पत्र संबंधित व्यावसायिकास देण्यात येईल.

ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांचा आढावा घेण्यासाठी अंगणवाडी सेविका, प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, वायरमन व आरोग्य सेविका यांच्याशिवाय इतर कोणताही शासकीय कर्मचारी उपस्थित नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

विषयपत्रिकेनुसार एक ते चौदा विषयांवर खेळीमेळीच्या वातावरणात ठराव मंजूर करण्यात आले. मात्र आठवडे बाजार कर वसुलीच्या लिलावासंदर्भातील ठराव ग्रामस्थांनी ठामपणे नामंजूर करून हा बाजार ग्रामपंचायतीनेच चालवावा, असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. ऐनवेळी ग्रामसभेत महत्त्वाच्या विषयांवर ठराव होतात, मात्र त्यावर पुढील कोणतीही कार्यवाही होत नसल्याबाबत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ग्रामपंचायतीने वृक्षलागवडीसाठी मोठा खर्च केल्याचा दावा केला असला तरी "झाडे नेमकी कुठे आहेत?" असा सवाल उपस्थित करण्यात आला. वृक्षसंवर्धनाची जबाबदारी ग्रामपंचायतीची असल्याचे मत

> शिंदेवाडी ते खतोडेवाडी रस्ता कॉक्रिटीकरणासाठी मोठा निधी मंजूर झाला आहे. मात्र शासनाच्या पोर्टलवर ऑनलाइन तक्रार झाल्याने काम थांबले आहे. तक्रार मागे घेण्यासाठी विनंती करून ठेकेदाराशी संपर्क साधून काम सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल." **— संतोष आंबरे, सरपंच, गणोरे**

वृत्तपत्र वितरक रमेश दातीर यांनी मांडले. कुक्कुटपालन व्यवसायासाठी असलेले नियम व निकष काटेकोरपणे पाळावेत तसेच अनधिकृत कुक्कुटपालन व्यवसाय बंद करण्याची मागणी ग्रामस्थांनी लावून धरली. कुक्कुटपालनामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून माशांचा प्रचंड उपद्रव होत असल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी संतप्त ग्रामस्थांनी माशांपासून निर्माण झालेली घाण थेट सभेतील टेबलावर ओतल्याने मोठा गोंधळ उडाला व काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, शिंदेवाडी ते खतोडेवाडी रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू असताना अज्ञात व्यक्तीने ऑनलाइन पोर्टलवर तक्रार केल्याने काम बंद पडले असून त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गावातील विकासकामांवरून होणारे वाद गणोरेकरांसाठी नवे नाहीत. मात्र २६ जानेवारी रोजी झालेली ग्रामसभा रस्ता कॉंक्रिटीकरण बंद आणि कुक्कुटपालनामुळे होणारे प्रदूषण या मुद्द्यांवरून विशेषतः वादळी ठरली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# Vivo Indiaकडून Vivo X200T भारतात लॉंच




**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

Vivo इंडियाने आज आपला नवा प्रीमियम स्मार्टफोन Vivo X200T भारतात अधिकृतपणे लॉंच केला. प्रगत ZEISS इमेजिंग तंत्रज्ञान, शक्तिशाली कामगिरी आणि दीर्घ बॅटरी आयुष्य यांचा समतोल साधणारा हा स्मार्टफोन 'एव्हरीडे फ्लॅगशिप' म्हणून सादर करण्यात आला आहे. दैनंदिन वापरात विश्वासार्हता, दर्जेदार कॅमेरा आणि स्मूथ सॉफ्टवेअर अनुभव शोधणाऱ्या ग्राहकांसाठी Vivo X200T खास डिझाइन करण्यात आला आहे. भारतात अचूक-अभियांत्रिकी आणि उत्पादन करण्यात आलेला Vivo X200T हा प्रगत तंत्रज्ञान, आधुनिक डिझाइन आणि अर्थपूर्ण नवोपक्रमांप्रती Vivo ची वचनबद्धता अधोरेखित करतो. किंमत आणि वैशिष्ट्यांच्या दृष्टीने हा स्मार्टफोन आपल्या सेगमेंटमधील सर्वोत्तम मूल्य प्रस्तावांपैकी एक मानला जात आहे. Vivo X200T मध्ये ZEISS सह-अभियांत्रिकी इमेजिंग सिस्टीम देण्यात आली आहे. यात 50 मेगापिक्सेलचा ZEISS सुपर टेलिफोटो कॅमेरा असून तो 3x ते 10x झूम रेंजसाठी विशेषतः ऑप्टिमाइझ करण्यात आला आहे.

शहरातील दृश्यांपासून ते बारकाव्यांच्या क्लोज-अप शॉट्सपर्यंत, वापरकर्त्यांना उच्च स्पष्टता आणि खोलीसह फोटो कॅप्चर करता येतात.

याशिवाय, 50 मेगापिक्सेलचा ZEISS मुख्य कॅमेरा, ऑप्टिकल इमेज स्टॅबिलायझेशन आणि ZEISS T* कोटिंगसह, पोर्ट्रेट, शहरी लँडस्केप आणि दैनंदिन फोटोग्राफीसाठी उत्कृष्ट अनुभव देतो.

**कामगिरी, सॉफ्टवेअर आणि डिझाइन**

हा स्मार्टफोन फ्लॅगशिप प्रोसेसिंग पॉवर, गुळगुळीत OriginOS अनुभव आणि आकर्षक आधुनिक डिझाइनचे संयोजन सादर करतो. उत्पादकता-केंद्रित वैशिष्ट्ये आणि दीर्घकालीन वापरासाठी उपयुक्त असलेली कामगिरी यामुळे Vivo X200T X सिरीजमधील सर्वात मजबूत मूल्य-आधारित ऑफर ठरतो.

**Vivo इंडियाची प्रतिक्रिया**

लॉंचप्रसंगी Vivo इंडियाचे उत्पादन व्यवस्थापन प्रमुख विकास तग्रा म्हणाले,

"दैनंदिन वापरात खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरणारे तंत्रज्ञान देणे हे Vivo चे मुख्य उद्दिष्ट आहे. ZEISS इमेजिंग कौशल्य, शक्तिशाली कामगिरी आणि परिष्कृत सॉफ्टवेअर अनुभव यांचा संगम साधणारा X200T वापरकर्त्यांच्या कॅप्चर, काम आणि कनेक्ट होण्याच्या पद्धतीला नवा आयाम देईल."

**किंमत, रंग पर्याय आणि उपलब्धता**

Vivo X200T दोन रंगांमध्ये उपलब्ध असेल – स्टेलर ब्लॅक आणि सीसाइड लिलाक.

12GB + 256GB व्हेरिएंट : ₹59,999

12GB + 512GB व्हेरिएंट : ₹69,999

हा स्मार्टफोन ३ फेब्रुवारी २०२६ पासून Vivo ची अधिकृत वेबसाइट, फ्लिपकार्ट आणि देशभरातील प्रमुख रिटेल स्टोअर्सवर उपलब्ध होईल.

ग्राहकांसाठी आकर्षक ऑनलाइन आणि ऑफलाइन ऑफर्स जाहीर करण्यात आल्या असून त्यात इन्स्टंट कॅशबॅक, एक्सचेंज/अपग्रेड बोनस, १८ महिन्यांची नो-कॉस्ट EMI, एक वर्षाची मोफत एक्सटेंडेड वॉरंटी, जिओ जेमिनी प्रो ऑफर तसेच V-शील्ड स्क्रीन डॅमेज प्रोटेक्शन प्लॅनवरील सवलतींचा समावेश आहे.

# जय मल्हार विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा तालुका पारनेर या विद्यालयामध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. यावेळी धोंडीभाऊ शेठ जगताप, संस्थेचे सचिव ॲड. पांडुरंग गायकवाड,उपसरपंच दादाभाऊ पुंडे,आकाश महाराज घोलप,राजाराम मुंढे,जालिंदर खोसे,माजी सरपंच नानाभाऊ भांबरे व बबन चिमाजी पुंडे,किसन मुंढे,गुलाब मुंढे,शंकर गायकवाड, रावसाहेब घुले,चौरंग घुले,खंडू सुपेकर,रघुनाथ पुंडे, भास्कर शेठ गायकवाड,लक्ष्मण नाना सुंबरे,राजाराम पुंडे,भास्कर घुले, बाळासाहेब मुंढे, गोपी घुले (अध्यक्ष तंटामुक्ती )कैलास गायकवाड, तान्हाजी मुळे, शांताराम खोसे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक, माजी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मुंबईकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी विद्यालयाचे ध्वजारोहण विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम सुंबरे सर यांच्या शुभ हस्ते होऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रभात फेरी गावातून मुख्य चौकात आल्यानंतर ग्रामपंचायत, ए.डी. सी.सी बँक,सेवा सोसायटी यांचा ध्वजारोहणाचा कार्यक्रम मुख्य चौकात संयुक्तपणे संपन्न झाला. विद्यालयाच्या प्रांगणामध्ये विद्यार्थ्यांची सामुहिक कवयात, विद्यार्थी भाषणे,विविध गुणगौरव बक्षीस वितरण प्रमुख मान्यवरांच्या हस्ते शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सदर करण्यात आला या कार्यक्रमात ९वी व १० वीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. कोरठण सामाजिक संस्था पिंपळगाव रोठा या संस्थेने मुलांना खाऊ वाटप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक उत्तम सुंबरे यांनी केले सूत्रसंचालन गर्कळ सर यांनी केले व शेवटी उंडे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जरांगे व केदारी सर तसेच इतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# ठाणे महापालिकेची महापौर निवडणूक लांबणीवर

■ अजित पवार यांच्या निधनामुळे दुखवटा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




ठाणे महापालिका निवडणुक निकालानंतर आता महापौर पदासाठी निवडणुक जाहीर झाली असून यानुसार, ३० जानेवारीला उमेदवारी अर्ज भरणे तर, ३ फेब्रुवारीला निवडणुक होणार आहे. या निवडणुकीची तयारी सुरू असतानाच, बुधवारी सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान दुर्घटनेत निधन झाल्याची घटना घडली. यामुळे तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आल्याने महापौर निवडणुक लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रशासकीय सुत्रांकडून मात्र वेळेत निवडणुका होण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. गेली तीन वर्षे रखडलेली ठाणे महापालिकेची निवडणुक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत ५५ टक्के इतके मतदान झाले होते. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा तीन टक्के कमी मतदान झाले होते. या निवडणुकीसाठी एकूण ६४९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यापैकी ठाण्यात शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे सात उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. यामुळे १२५ जागांसाठी ६४३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. या निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेचे ७५, भाजपचे २८, राष्ट्रवादी (शरद पवार) १२, राष्ट्रवादी (अजित पवार) ९, एमआयएम ५, शिवसेना (उबाठा) १, अपक्ष १ असे १३१ नगरसेवक निवडून आले आहेत.

ठाणे महापालिकेत सत्तास्थापनेसाठी ६६ नगरसेवकांचे संख्याबळ असणे आवश्यक आहे. या निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेने ७५ नगरसेवक निवडून आणत बहुमताचा आकडा पार केलेला आहे. शिंदेची शिवसेना आणि भाजप या दोन्ही पक्षांनी युतीत निवडणुक लढविली असली तरी, शिंदेच्या शिवसेनेकडे सत्तास्थापनेइतका बहुमताचा आकडा असल्याने त्यांच्या पक्षाचा महापौर होईल अशी शक्यता आहे.

# हॉर्टीकनेक्ट इंडिया एक्सपोची बेंगळुरूमध्ये पुनरागमन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

हॉर्टीकनेक्ट इंडिया एक्सपोची 2026 आवृत्ती 1 ते 3 ऑक्टोबरदरम्यान बेंगळुरु इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर (BIEC) येथे आयोजित केली जाणार आहे. यंदा हा एक्सपो अधिक व्यापक स्वरूपात सादर होणार असून, भारताच्या मोठ्या कृषी क्षेत्राशी अधिक थेट जोड निर्माण करण्याच्या दिशेने पावले उचलत आहे. या ट्रेड फेअरचे सह-आयोजन मेस्से म्युएनचेन इंडिया आणि बेंगळुरुस्थित हॉर्टीकनेक्ट ग्लोबल प्रा. लि. यांच्या भागीदारीत केले जाणार आहे. मेस्से म्युएनचेन इंडिया चे सीईओ आणि मेस्से म्युएनचेनचे प्रेसिडेंट – (इंडिया, मिडल ईस्ट, आफ्रिका) भूपिंदर सिंह म्हणाले, "ही भागीदारी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रदर्शनी व्यवस्थेला प्रादेशिक ताकदींशी जोडते.

# जागतिक स्तरावर चमकण्यासाठी भारतीय फिगर स्केटर गौरी राय सज्ज

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




हरियाणाच्या 17 वर्षीय गौरी रायने लेह येथे पार पडलेल्या 2026 'खेलो इंडिया विंटर गेम्स'च्या पहिल्या टप्प्यात अत्यंत प्रभावी कामगिरी करत 'ॲडव्हान्स फिगर स्केटिंग' श्रेणीत सुवर्णपदक पटकावले. या खेळाच्या इतिहासात पहिल्यांदाच फिगर स्केटिंगचा समावेश 'खेलो इंडिया'मध्ये करण्यात आला होता. गुरुग्राममध्ये सराव करणाऱ्या गौरीने नवांग दोर्जन स्तोबदान स्टेडियमवर या क्रीडा प्रकारातील पहिले सुवर्णपदक जिंकून आपला ठसा उमटवला. गौरीचा फिगर स्केटिंगमधील प्रवास काहीसा वेगळ्या पद्धतीने सुरू झाला. सुरुवातीला ती 'रोलर स्केटर' होती, पण 2017 मध्ये गुरुग्राममधील 'ॲम्बियन्स मॉल'मध्ये फिगर स्केटिंगचे प्रात्यक्षिक पाहिल्यानंतर तिच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळाली. या खेळातील वेग आणि सुबकता यांनी ती भारावून गेली. त्यानंतर तिने 'क्वाड' आणि 'इन-लाईन' स्केटिंग सोडून फिगर स्केटिंगकडे वळण्याचा निर्णय घेतला आणि हळूहळू आपले कौशल्य विकसित केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरही तिची ओळख निर्माण होत असून, 2022 मध्ये दुबईतील 'संयुक्त अरब अमिराती फिगर स्केटिंग चॅम्पियनशिप'मध्ये तिने रौप्य पदक पटकावले आहे. याशिवाय तिने दक्षिण कोरिया, सिंगापूर, फिलिपिन्स आणि बल्गेरिया यांसारख्या देशांमधील स्पर्धांमध्येही सहभाग नोंदवला आहे.

लेहमध्ये विजय मिळाला असला तरी, गौरीने प्रांजळपणे कबूल केले की स्पर्धेत उतरताना तिचा आत्मविश्वास पूर्ण नव्हता. उंचीवरील वातावरणामुळे श्वास घेण्यास होणाऱ्या त्रासामुळे, तिच्या 'रुटिन' दरम्यान (स्केटिंगच्या सादरीकरणावेळी) तिला धाप लागली होती. तिची मुख्य प्रतिस्पर्धी जेसी राज माथ्रापू ही सादरीकरणादरम्यान खाली पडल्यामुळे आपल्याला सुवर्णपदक मिळण्यास मदत झाली, हे देखील तिने मान्य केले. असे असूनही, आपल्या आई-वडिलांच्या अढळ विश्वासामुळेच हे यश मिळाल्याचे तिने सांगितले आणि विजयानंतर कुटुंबासोबत हा आनंद साजरा केला.

गौरीने 'खेलो इंडिया' उपक्रम आणि 'भारतीय क्रीडा प्राधिकरण' (SAI) यांचे जागतिक दर्जाच्या आयोजनाबद्दल कौतुक केले. बर्फाचा दर्जा, राहण्याची व्यवस्था, जेवण, वाहतूक आणि माध्यमांकडून मिळणारे कव्हरेज या सर्व गोष्टी अतिशय उच्च दर्जाच्या असल्याचे तिने नमूद केले. भारतात अजूनही तसा नवीनच असलेल्या या खेळासाठी अशा प्रकारच्या व्यासपीठाची आणि प्रसिद्धीची किती गरज आहे, यावर तिने विशेष भर दिला.

# टेक्नो स्पार्क गो 3 रु. ८,९९९ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध

## टिकाऊपणा आणि सर्वोत्तम सिग्नलवर लक्ष केंद्रित

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सर्वसामान्य भारतीयांसाठी तयार केलेला,टेक्नो स्पार्क गो 3, जो ₹८,९९९ मध्ये उपलब्ध आहे, आता देशभरात विक्रीसाठी उपलब्ध आहे. वास्तविक जीवनातील वापरासाठी डिझाइन केलेला, हा फोन अशा वापरकर्त्यांसाठी टिकाऊपणा, स्मार्ट वैशिष्ट्ये आणि सर्वोत्तम कनेक्टिव्हिटी एकत्र आणतो, जे त्यांच्या डिव्हाइसकडून दैनंदिन जीवनाशी जुळवून घेण्याची अपेक्षा करतात.

'देश जैसा दमदार' या तत्त्वज्ञानावर आधारित,टेक्नो स्पार्क गो3 एक अशी चमक घेऊन येतो जी वापरकर्त्यांना थोडे अधिक तेजस्वीपणे चमकण्यास मदत करते. हा फोन अशा लोकांसाठी बनवला आहे ज्यांना एक महत्त्वाकांक्षी दिसणारा फोन हवा आहे, जो दैनंदिन, वास्तविक जीवनातील अनिश्चितता आत्मविश्वासाने हाताळू शकेल.

स्पार्क गो3 आई पी64 धूळ आणि पाणी प्रतिरोधक क्षमतेसह येतो, तसेच तो पडल्यास होणारे नुकसान सहन करण्याइतका टिकाऊ आहे, ज्यामुळे वापरकर्ते दैनंदिन धक्के, सांडणे आणि आश्चर्यांपासून चिंतामुक्त राहू शकतात. या अनुभवात भर घालतो तो १२०हर्ट्ज सुपर स्मूथ डिस्प्ले, जो स्क्रोलिंग, स्वाइपिंग आणि ॲप्स स्विच करणे लक्षणीयरीत्या वेगवान आणि अधिक प्रवाही बनवतो - असा स्मूथनेस जो तुम्हाला त्वरित जाणवतो. गोष्टी स्मार्ट आणि सोप्या ठेवण्यासाठी एला एआयआहे, जो टेक्नो चा व्हॉइस असिस्टंट आहे आणि तो वापरकर्त्यांना त्यांच्या स्वतःच्या भाषांमध्ये, ज्यात हिंदी, तमिळ, बंगाली, गुजराती आणि मराठी यांचा समावेश आहे, समजून घेतो. दैनंदिन कामे असोत किंवा त्वरित आदेश, संवाद नैसर्गिक आणि सहज वाटतो. आणि जेव्हा नेटवर्क लपंडाव खेळायला लागते, तेव्हा नो नेटवर्क कम्युनिकेशन 2.0 हे सुनिश्चित करते की वापरकर्ते वेअरहाऊस, तळघर, कारखाने, बांधकाम क्षेत्र आणि ग्रामीण भागांसारख्या कमी किंवा नेटवर्क नसलेल्या भागातही कनेक्टेड राहू शकतील.




टेक्नो स्पार्क गो3 आता ४जीबी रॅम + ६४जीबी स्टोरेज व्हेरिएंटमध्ये ₹८,९९९ मध्ये, भारतातील प्रमुख रिटेल स्टोअर्समध्ये आणि ॲमेझॉनवर उपलब्ध आहे. हा स्मार्टफोन चार रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे: टायटॅनियम ग्रे, इंक ब्लॅक, गॅलेक्सी ब्लू आणि ऑरोरा पर्पल. स्पार्क गो3 केवळ दिखावा करण्यासाठी आलेला नाही. तो दमदार, विश्वासार्ह आणि दैनंदिन भारतासाठी सज्ज होण्यासाठी आला आहे.

# विद्यार्थी रंगले स्नेहसंमेलनात

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

गुजराथी हायस्कूल चे २००३ ची वर्ग १० वा चे बॅच मधील सर्व विदयार्थांचे वतिने उमंग स्नेहमिलन सोहळा २६ जानेवारी २०२६ रोजी गुजराथी हायस्कूल येथे पार पडला. गुजराती हायस्कूल मधून देश विदेशात विविध काम ,व्यवसाय, उद्योग, नोकरी निमित्त विखुरलेल्या सर्व क्लासमेंटने एकत्र येत साजरा केलेला स्नेह संमेलनाचा हा सोहळा संस्मरणीय असा ठेवला आहे. यावेळी शिक्षक एल. के. कुलकर्णी, डि.आर. कुलकर्णी, उमाकांत देशमुख, रवि सुमठाणकर, सापळगांवकर सर, प्रदिप कुलकर्णी, गायकवाड टिचर, जोशी कळंबरकर, थापे टीचर, लीना शहा, चंद्रकला कुलकर्णी, मेघा जोशी, टोके टिचर, प्रणिता केसराळे, पदमजा जोशी, शकुंतला पांडे, ज्योती शिंदे, सिमा जोशी, अनिता मुळे, विदया मुळे, मंगळूरकर टिचर, अनुराधा कुलकर्णी, अष्टूरकर टिचर, सुरेखा देशपांडे, प्रज्वला देशपांडे, प्रेमा साकोळकर, मिना ठाकूर, या शिक्षक वृंदाचा सत्कार उमंग स्नेहमिलन सोहळयासाठी आलेल्या विदयार्थी-विदर्थ्यांनीचे वतिने करण्यात आला.

# मेस्ता राज्यस्तरीय अधिवेशन यंदा शिर्डीत

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील इंग्रजी माध्यमांच्या शाळा व शिक्षण संस्थांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असलेली महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन (MESTA) यांचे ११वे राज्यस्तरीय अधिवेशन, पुरस्कार वितरण सोहळा व शैक्षणिक प्रदर्शन २०२६ हे ३१ जानेवारी २०२६ रोजी शिर्डी येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनाला राज्यातील शिक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक मान्यवर, नामदार, शिक्षणतज्ज्ञ, शाळा व्यवस्थापक, ट्रस्टी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनाचे उद्घाटन मा. दादा भुसे (मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. राधाकृष्ण विखे पाटील, मा. अनिल गवांदे, डॉ. सुधीर तांबे, मा. रस्ताने केरावाला, आमदार किशोर टडगे यांची उपस्थिती लाभणार आहे.

ISO 2001-2015

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. संजयदत्त तायडेपाटील यांची महत्त्वपूर्ण उपस्थिती राहणार आहे. शिक्षण क्षेत्रासाठी मेस्ताचे भरीव योगदान MESTA ही ISO 2001:2015 मानांकन प्राप्त, नॉन-पॉलिटिकल संस्था असून महाराष्ट्रातील इंग्रजी माध्यमांच्या शाळा, ट्रस्ट व शिक्षण संस्थांसाठी धोरणात्मक, कायदेशीर, शैक्षणिक आणि प्रशासनिक पातळीवर मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. शाळांचे प्रश्न, नवीन शैक्षणिक धोरण, शिक्षकांचे हक्क, विद्यार्थ्यांचे भवितव्य आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या मुद्द्यांवर मेस्ताने सातत्याने आवाज उठवला आहे. अधिवेशनात उत्कृष्ट शाळा, आदर्श शिक्षक, गुणवंत संस्था, शैक्षणिक नवोपक्रम यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच शैक्षणिक प्रदर्शन (Educational Expo 2026) मध्ये आधुनिक शिक्षण पद्धती, डिजिटल शिक्षण, शालेय व्यवस्थापन तंत्रज्ञान यांचे सादरीकरण होणार आहे. ३१ जानेवारी २०२६ रोजी आत्मा मालिक ध्यानपीठ, शिर्डी – कोपरगाव रोड येथे आयोजित केले असून शिक्षण क्षेत्रासाठी दिशा ठरवणारे अधिवेशन MESTA चे हे ११वे राज्यस्तरीय अधिवेशन शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे, धोरणात्मक निर्णयांसाठी मार्गदर्शक आणि संस्थात्मक एकतेचे प्रतीक ठरणार असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.




ठाणे : मिस ज्युनिअर गॅरंटी युनिव्हर्स इंडिया सिझन 2 मुंबईमध्ये ठाण्यातील दिवा शहरात राहणारी कु. आर्या संदीप वायले हिने शानदार अशी कामगिरी केली आहे. दिवा शहरातील आर्या गुरुकुल शाळेत शिकणारी कु. आर्या मुंबईत 11 जानेवारी 2026 रोजी पार पडलेल्या शानदार सोहळ्यात तिला प्रथम क्रमांक मिळाला आहे. (फोटो - संतोष पडवळ)

## 'दस्तखत' वर्ल्ड टूरच्या भारत टप्प्यातील खास कार्यक्रम

# अनुव जैन यांनी पुण्यात 'हाऊस ऑफ मॅकडॉवेल्स सोडा यारी जॅम' शोमध्ये दिला अविस्मरणीय संगीत अनुभव

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे शहराने एका भावनिक आणि आठवणींनी भरलेल्या संध्याकाळी संगीतप्रेमींना आनंदी केले, जेंव्हा गायक-गीतकार अनुव जैन यांनी त्यांच्या 'दस्तखत' वर्ल्ड टूरच्या भारत टप्प्यात पुण्यातील प्रेक्षकांसमोर प्रस्तुती दिली. टीम इनोव्हेशन आणि ट्रायबव्हाइब एंटरटेनमेंटने आयोजित आणि प्रचार केलेल्या, आणि पुण्यात हाऊस ऑफ मॅकडॉवेल्स सोडा यारी जॅमच्या माध्यमातून सादर केलेल्या या शोमध्ये हजारो संगीतप्रेमी आणि चाहते एकत्र आले, ज्यांनी जवळीक अनुभवत, मनाला स्पर्श करणारी लाईव्ह परफॉर्मन्स पाहिली आणि अनुव जैनच्या आतापर्यंतच्या सर्वात महत्वाकांक्षी संगीत प्रवासाची सुरुवात झाली.

अनुव जैन स्टेजवर येताच संपूर्ण वातावरण भावनिक आणि अंतर्मुख होऊन गेले. त्यांच्या साध्या आणि भावपूर्ण सादरीकरणाच्या शैलीत, त्यांनी 'बारीशें', 'अलग आसमान', 'हुस्न', 'जो तुम मेरे हो', 'अफसोस' आणि 'अर्ज किया है' यांसारखी चाहत्यांची आवडती गाणी गायली. प्रत्येक सादरीकरणावर प्रेक्षकांनी भावपूर्ण स्वरात साथ दिली, ज्यामुळे त्यांच्या संगीताशी भारतीय प्रेक्षकांचा घट्ट नातेसंबंध दिसून आला.

पुण्यातील शोमध्ये साधेपणा आणि संगीतावर लक्ष केंद्रीत करणाऱ्या सादरीकरणमुळे विशेष ठरली. लाइट्स मंद होताच आणि सुरांची लहर उठताच, संपूर्ण वेन्यू प्रेम, विरह आणि उपचारांच्या कथांनी भरून गेला, ज्यामुळे चाहत्यांसाठी हा अनुभव खूप खास आणि वैयक्तिक बनला.

अनुव जैन म्हणाले, "पुणे माझ्यासाठी खूप खास ठिकाण ठरले. माझ्या संगीताला मिळालेल्या प्रेम आणि प्रामाणिक प्रतिसादामुळे माझ्यासाठी हा अनुभव अनमोल आहे. आजची संध्याकाळ अशी होती जणू आपण सर्वजण एकत्र नवीन अध्याय सुरू करत आहोत, ज्यांनी माझ्या गाण्यांसोबत प्रत्येक भावना अनुभवली आणि रात्रीला खास बनवले." शोवेन शाह, संस्थापक आणि सीईओ, ट्रायबव्हाइब एंटरटेनमेंट म्हणाले, "अनुव जैनची कलात्मकता भारतीय संगीताच्या स्वतंत्र आवाजाला नव्या उंचीवर घेऊन जाते. 'दस्तखत' या कार्यक्रमाद्वारे आम्ही एक असा अनुभव देत आहोत, जिथे प्रेक्षकांना खरा संवाद अनुभवता येईल. आम्ही अशा अनुभवांची निर्मिती करतो जिथे सर्जनशीलता आणि समुदायाचा संगम होतो, आणि या महत्त्वाच्या टप्प्याला पाठिंबा देणे हे भारतीय संगीताच्या भविष्यातील आमच्या विश्वासाचे प्रतीक आहे."



वरुण कुरिच्छ, व्हाईस प्रेसिडेंट आणि पोर्टफोलिओ हेड, मार्केटिंग, डियाजियो इंडिया म्हणाले, "संगीत आणि मैत्री नेहमीच हाऊस ऑफ मॅकडॉवेलच्या केंद्रस्थानी राहिली आहेत, आणि ही भावना भारतातील सर्वात मोठा ब्रँडेड म्युझिक आयपी 'यारी जॅम' द्वारे जिवंत होते. गेल्या वर्षी, आम्ही पाच शहरांमध्ये 50,000 हून अधिक ग्राहकांना एकत्र आणले. यावर्षी, आम्ही 'यारी जॅम' 15 शहरांमध्ये घेऊन जात आहोत, जिथे आजच्या पिढीच्या आवाज आणि संगीत व्यक्त करणाऱ्या कलाकारांची दमदार लाईनअप असेल. आम्हाला आशा आहे की या प्रवासात 1,00,000 हून अधिक लोक सामील होतील आणि खऱ्या मैत्रीच्या भावनेचा उत्सव साजरा करत राहतील.."

मोहित बिजलानी, संस्थापक, टीम इनोव्हेशन म्हणाले, "अनुव जैनचे कॉन्सर्ट्स भारताच्या स्वतंत्र संगीत क्षेत्राच्या वाढीचे उदाहरण आहेत. 'दस्तखत' हा फक्त एक टूर नाही तर हा अनुव जैनसाठी आणि स्वतंत्र संगीत समुदायासाठी एक महत्वाचा टप्पा आहे, आणि या प्रवासाचा भाग असल्याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो."

# दादामाणूस !

अजित पवारांचा दिवस लवकर सुरू होत असे. भल्या सकाळी ते अचानक कुठे भेट देतील, कशाची पाहणी करतील, याचा अंदाज बांधता येत नसे. अशाच एका सकाळी राजभवनात शपथ घेऊन त्यांनी महाराष्ट्राला धक्का दिला होता. मात्र, बुधवारी सकाळी त्यांनी जो धक्का दिला, त्यातून महाराष्ट्र सावरलेला नाही. संपूर्ण महाराष्ट्र शोकव्याकुळ झालेला आहे. एका तडफदार नेत्याला आपण गमावले आहे. ज्या अपघातामुळे महाराष्ट्राने असा कर्तबगार नेता गमावला, त्या विमान अपघाताची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. असा एखादा नेता घडण्यासाठी कित्येक वर्षे जातात. राजकारणाच्या आखाड्यात सुमारे पाच दशके असूनही, आपल्या शब्दाचा महिमा अजित पवारांनी कायम ठेवला होता. दादा जे बोलतात, तेच करतात, ही त्यांची ख्याती होती. जे अशक्य आहे, ते स्पष्ट शब्दात सांगणार. मात्र, एकदा शब्द दिला की ते काम तडीस नेणार, ही खात्री होती. त्यामुळेच 'कामाचा माणूस' ही त्यांची ओळख होती. काम करताना कोण कुठल्या पक्षाचा, हेही ते कधी बघत नसत. अगदी सामान्यातल्या सामान्य माणसालाही ते आपले वाटत. दादा हे रसायनच वेगळे होते. 'मैने हमेशा मेरे दिल की सुनी है...', असे ते एका मुलाखतीत म्हणाले होते. याच स्वभावामुळे त्यांनी पारंपरिक राजकारणाचे निकष बदलून टाकले. आपल्या मनात काय आहे, याचा इतरांना पत्ता लागता कामा नये, हे अनेक राजकीय नेत्यांचे स्वभाववैशिष्ट्य. दादा मात्र कोणाचाही मुलाहिजा न ठेवता थेटपणे बोलणारे. जे पोटात आहे, तेच ओठात आणणारे. त्याची काय किंमत चुकवावी लागेल, याचा जराही विचार न करणारे. ते महाविकास आघाडीत असोत की महायुतीत, आपली थेट भूमिका त्यांनी



## संपादकीय

कधी लपवून ठेवली नाही. जात वा धर्माचे राजकारण त्यांनी कधी केले नाही. त्यांना संसदीय राजकारणाची शिस्त माहीत होती. सामान्य माणूस हा लोकशाहीत मालक आहे, याबद्दल दुमत नव्हते. त्यामुळे एखाद्या कर्तबगार स्टेट्समनप्रमाणे 'नो नॉनसेन्स' अशा पद्धतीने ते काम करत राहिले. ते कार्यकर्त्यांचे लाडके 'दादा' झाले, त्याचे कारण हेच. दिलेला शब्द पाळणे, कार्यकर्त्यांना प्रेमाने जपणे आणि काम करेल त्याला संधी देणे या स्वभावामुळे अजित पवारांना असा जनाधार मिळू शकला.

महाराष्ट्राच्या राजकारणात उपमुख्यमंत्रिपद पहिल्यांदा आले ते १९७८ मध्ये. बॅ. नासिकराव तिरपुडे हे पहिले उपमुख्यमंत्री. त्यानंतर अलीकडच्या इतिहासात हे पद अजित पवारांसाठीच तयार केले आहे



असे वाटावे, इतक्या वेळा त्यांनी ते मिळवले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण असोत की देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे असोत की एकनाथ शिंदे, अजित पवारांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना आपला ठसा उमटवला. अजित पवारांचे राजकारण आकाराला आले ते बारामती तालुक्यात. त्यामुळे ते ग्रामीण भागातील नेते. आपला हा ग्रामीण बाज त्यांनी कधी लपवला नाही. उलटपक्षी अभिमानाने मिरवला. त्यांच्या वक्तृत्वाचे अनेक चाहते होते. भाषण असो की पत्रकार परिषद, आपल्या खास रांगड्या आणि खेळकर शैलीत अजित पवार बोलत. या महानगरपालिका निवडणुकीत त्यांनी थेट भाजपलाच अंगावर घेतले. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत अजित पवारांनी मोठे आव्हान उभे केले. ही निवडणूक त्यांनी विकासाच्या मुद्द्यावर आणली. अर्थात, त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. मात्र, लगेच ते जिल्हा परिषद निवडणुकीच्या तयारीला लागले. अलीकडची घटना. पुणे ग्रॅण्ड सायकल टुरचा समारोप होता. अजित पवार प्रमुख पाहुणे होते. त्यावेळी ते म्हणाले, 'पुणेकरांनी या सायकल स्पर्धेला जोरदार प्रतिसाद दिला. अर्थात, महापालिका निवडणुकीत तसा प्रतिसाद आम्हाला दिला नाही, ही गोष्ट वेगळी'... त्यांची विनोदबुद्धी अतिशय तल्लख. राजकारणात विखार वाढत असताना आणि शह-काटशह म्हणजे राजकारण असा समज झालेला असताना, अजित पवारांचा हा दिलखुलास मोकळेपणा त्यांच्या विरोधकांनाही आवडत असे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | | | | |
| | | 6 | 2 | | 1 | | 7 | 8 |
| 7 | 1 | 3 | | 8 | | | 5 | 9 |
| | 9 | | | | 2 | | | 6 |
| | | | 5 | 9 | 3 | | | |
| 1 | | | 6 | | | | 9 | |
| 3 | 2 | | | 6 | | 9 | 4 | 5 |
| 4 | 5 | | 3 | | 9 | 6 | | |
| | | | | | | 1 | | |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे. या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 9 | 8 | 6 | 5 | 7 | 3 | 1 |
| 6 | 3 | 7 | 9 | 2 | 1 | 4 | 5 | 8 |
| 1 | 8 | 5 | 3 | 7 | 4 | 2 | 9 | 6 |
| 4 | 7 | 1 | 6 | 5 | 9 | 8 | 2 | 3 |
| 8 | 9 | 6 | 1 | 3 | 2 | 5 | 7 | 4 |
| 5 | 2 | 3 | 4 | 8 | 7 | 6 | 1 | 9 |
| 3 | 5 | 8 | 7 | 9 | 6 | 1 | 4 | 2 |
| 7 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 9 | 8 | 5 |
| 9 | 1 | 2 | 5 | 4 | 8 | 3 | 6 | 7 |

उत्तर उद्याच्या अंकात

पंचांग
२९ जानेवारी २०२५
गुरूवार
विक्रम संवत्- २०८२
माघ शके संवत्- १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- माघ
ऋतु- सौर शिशिर
शुक्ल पक्ष
तिथि:एकादशी
१३:५५:२४

नक्षत्र:रोहिणी
०७:३१:२६
नक्षत्र:मृगशिर्षा
२९:२९:०६+
योग:ऐन्द्र २०:२६:५५
करण:विष्टि १३:५५:२४

## उपदेशाचे डोस

### बलाढ्याशी लढा

एकदा एका उन्मत्त हत्तीनं वृक्षाला धडक दिली. चिमणा- चिमणीचं घरटं उद्ध्वस्त होऊन खाली पडलं. त्यातली अंडी फुटून गेली. ती दोघं दुःखी झाली. हत्तीला धडा शिकवायचा होता त्यांना पण कसा, हा प्रश्न होता. त्याचं सांत्वन करायला आलेल्या माशी, बेडूक व सुतार पक्ष्यानं मिळून एक युक्ती केली. चिमणा-चिमणीला धीर दिला. आपण दुर्बल असलो तरी काय झालं? बलाढ्याशी लढा देऊ. मग ठरल्याप्रमाणे हत्तीच्या कानापाशी माशी गुणगुणली. खड्ड्याच्या टोकापाशी बेडकानं आवाज काढला. तिथे पाणी असावं म्हणून हत्तीनं तिथे पाऊल ठेवलं आणि तो खड्ड्यात पडला. सुतार पक्ष्यानं या गडबडीत त्याचा डोळा फोडला. अशारीतीने तिघांना एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने त्या बलाढ्य हत्तीला धडा शिकविला.

कथा उपदेश : थोडी युक्ती, साहस आणि एकी असेल तरी बलाढ्याशीही लढा देता येईल.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८४६ – सर हॅरी स्मिथच्या ब्रिटीश सैन्याने अलीवालची लढाई जिंकली.
- १९३२ – दुसऱ्या महायुद्धात जपानने शांघाय काबीज केले.
- १९८६ – अंतराळ यान(स्पेस शटल) चॅलेंजरचा उड्डाण करताना विस्फोटात विनाश. सात अंतराळयात्र्यांचा मृत्यू.
- २००८ – बॉलीवुड किंग शाहरुख खानला फ्रान्स सरकारचा प्रतिष्ठित पुरस्कार 'इंसिग्निया ऑफ ऑफिसर इन द आर्डर ऑफ आर्टस अँड लेटर्स'ने गौरविण्यात आले.

### राष्ट्रीय

- २००८ – भारतीय टेनिस स्टार सानिया मिर्झा डब्ल्यूटीएच्या क्रमवारीत २९ व्या स्थानावर पोहोचल्यासोबतच ती अशियाची पहिल्या क्रमांकाची खेळाडू बनली.
- २००८ – के.ई.सी. इंटरनॅशनलचे व्यवस्थापकीय संचालक रमेश चांडक यांची उद्योगजगतातील भरीव कामगिरी करणाऱ्या व सी.ए. प्रोफेशनमध्ये योगदान देणाऱ्या यशस्वी व्यक्तीची चार्टर्ड अकाउंटंट बिझिनेस लीडर या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.


### जन्म

- १४५७ – हेन्री सातवा, ब्रिटीश राजा.
- १९८१ – एलायजाह् वूड, अमेरिकन नट.

### निधन

- ८१४ – शार्लमेन, ब्रिटीश क्रांतिकारी.
- १९८६ – स्पेस शटल चॅलेंजरचे प्रवासी
- २००७ – ज्येष्ठ संगीतकार ओ.पी.नय्यर यांचे हृदयविकाराने निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७६



**आडवे शब्द**

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर-वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म-मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

**उभे शब्द**

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. -- दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. विश्वासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषेत पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान
५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ७५ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर : १.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी

# आनंदगड शैक्षणिक संकुलात देशाचे भवितव्य घडविण्याचे काम

## प्रकल्प अधिकारी बोकडे

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

वीरगाव सारख्या ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देत असतानाच सांस्कृतिक, कला क्रीडा व संस्कारी पिढी घडविण्याचे काम आनंदगड शैक्षणिक संकुलात होत असल्याने देशाचे भवितव्य खऱ्या अर्थाने या संकुलात घडविण्याचे काम होत असल्याचे प्रतिपादन राजूर आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले.

वीरगाव ता. अकोले येथील आनंदगड शैक्षणिक संकुलातील धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंतीनिमित्त इंग्लिश मिडीयम स्कूल च्या ४ दिवसीय आनंद फेस्टिवल या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेल्या मराठी सिने अभिनेत्री रुचिरा देसाई, इन्फोसिस पुणेचे वरिष्ठ तांत्रिक आर्किटेक्ट कृष्णा बोठे, एक्सेंटर पुणे च्या मॅनेजर स्नेहा चव्हाण, सहायक प्रकल्प अधिकारी दीपक कालेकर,संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ अनिल रहाणे, सुप्रिया वाकचौरे, गीता रहाणे , उत्तम बोठे, सौ.बोठे, स्वाती झोळेकर,कवी ज्ञानेश पुंडे, प्राचार्य किरण चौधरी, मिलिंद सुर्वे, विद्याचंद्र सातपुते, प्राचार्या पल्लवी फलके, सरपंच प्रगती वाकचौरे, कांता बोठे, दिव्या वाकचौरे, अनिल डोळस, विजय वाघ,रावसाहेब गोर्डे,आदी उपस्थित होते.



यावेळी बोलताना श्रीमती बोकडे म्हणाल्या की, अतिशय खडतर मेहनत घेऊन रावसाहेब वाकचौरे व डॉ.अनिल रहाणे यांनी हे संकुल उभे केले असून त्यांच्या त्याग व समर्पणाला तोड नाही. आदिवासी विकास विभागाचा देखील संस्थेच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. संस्थेची प्रगती दिवसेंदिवस वेगाने होत असताना देशाचे भविष्य घडवण्यासाठी त्याना सर्व सहकार्य व शुभेच्छा असल्याचेही त्या म्हणाल्या.

सिने अभिनेत्री रुचिरा देसाई यांनी आपल्या अभिनयाची सुरुवात शालेय जीवनात झाली असून सांस्कृतिक कार्यक्रमांमधूनच मुलांच्या कला गुणांना वाव मिळत असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी संस्था घेत असलेल्या परिश्रमाचे कौतुक केले. तर आपल्या आईवडिलाचा व गुरुजनांचा नेहमी आदर ठेवा,कलागुणांबरोबर अभ्यासाकडे जास्त लक्ष द्यावे असे मत व्यक्त केले. कृष्णा बोठे यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी अभ्यासाबरबरोबरच इतर गुणही अंगी बाळगणे गरजेचे असल्याचे सांगितले. आपली आजी कासूबाई बोठे यांच्या स्मरणार्थ १० वी परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी पुढील शिक्षणासाठी स्कॉलरशिप सुरू करन्याची घोषणा केली.

डॉ. अनिल रहाणे यांनी आपल्या मनोगतातून संस्थेची जडणघडण नमूद केली. यावेळी कवि ज्ञानेश पुंडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्व मान्यवराच्या हस्ते धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वर्षभर आयोजित स्पर्धांचे पारितोषिक वितरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

महिला पालकांसाठी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व उपस्थित पालकांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

मान्यवरांचे सोनाली नले यांच्या लेझीम पथकाने मान्यवरांचे वाजतगाजत स्वागत केले.

प्राचार्य किरण चौधरी यांनी प्रास्ताविक केले .स्वागत व मान्यवर पाहुण्यांचा परिचय प्रा डॉ. प्रतीक्षा रहाणे , अंजीरा देशमुख यांनी करून दिला सत्काराचे नियोजन शिवराज वाकचौरे व अक्षय रहाणे , रविंद्र आंबरे, सीमा दिघे यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा संदीप थोरात तर आभार शिल्पा देशमुख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी देविदास चारुडे , नफीसा शेख, अलका आहेर, पिंगला सोनवणे, कविता दातीर, सुजाता भांगरे, आदित्य नाईकवाडी,सोनाली तनपुरे, उषा गुंजाळ, प्रा देशमुख प्रा प्रमोद प्रा वैभव, राहुल चिकणे,पंकज वर्पे, गोरक्ष पवार, लक्ष्मण कवडे, साईनाथ वैद्य,मयुरी कोल्हे, अमोल ससाणे,पूजा चौधरी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पॉलिटेक्निक व फार्मसी कॉलेज चा स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

यावेळी धर्मवीर आनंद दिघे स्कूल ला राष्ट्रीय पारितोषिक मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सचिव डॉ. अनिल रहाणे यांचा सत्कार करण्यात आला.

---

## अहिल्यानगर महापालिकेत शासन निर्णयाप्रमाणेच स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्याची मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

- निकष डावलल्यास न्यायालयीन कारवाईचा इशारा

शासनाने २८ फेब्रुवारी २०१२ रोजी जारी केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकानुसारच महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात यावी, अशी मागणी प्रहार अपंग क्रांती संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात संस्थेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासन निर्णयानुसार महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक म्हणून त्या-त्या शहरातील क्रीडा, शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, न्यायपालिका, विधी तज्ज्ञ, वैद्यकीय क्षेत्र, संस्कृती, इतिहास, साहित्य तसेच समाजसेवा या विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींची नियुक्ती करणे अपेक्षित आहे. अशा तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींच्या सहभागामुळे शहराच्या सर्वांगीण विकासाला खऱ्या अर्थाने चालना मिळू शकते आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या प्रभावीपणे सोडविण्यास मदत होऊ शकते, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

स्वीकृत नगरसेवक ही संकल्पना राजकीय पक्षांनी वाटून दिलेल्या "रेवड्या किंवा खिरापत" म्हणून वापरणे चुकीचे असून, याबाबत शासनाने स्पष्ट नियम व निकष ठरवून दिलेले आहेत. या नियमांचे काटेकोर पालन होणे अत्यंत आवश्यक आणि बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या निकषांकडे दुर्लक्ष करून केवळ राजकीय दबावाखाली स्वीकृत नगरसेवकांची निवड केली जात असल्याचा आरोपही प्रहार अपंग क्रांती संस्थेच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी स्वतः औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केलेली असून, ही याचिका सध्या मा. न्यायालयात प्रलंबित आहे. या विषयावर न्यायालयीन लढा सुरू असून शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी संस्थेचा पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती न करता केवळ राजकीय दबावाखाली निवड करण्यात आल्यास, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात न्यायालयीन कारवाई करण्यास आम्ही बाध्य राहू, असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

---

## "अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली"

**(समर्थ गांवकरी)**

हे शब्द उच्चारतानाही अंतःकरण हेलावून गेले आहे. ज्यांचे बोट धरून मी राजकारणात प्रवेश केला, ते आपले अजितदादा आज आपल्यात नाहीत, ही वेदना असह्य आहे. मागील ३५–४० वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात व विकासाच्या प्रक्रियेत त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आणि अविस्मरणीय आहे. त्यांची सचोटी, संवेदनशीलता, कर्तव्यदक्षता आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व शब्दांत मांडणे अशक्य आहे. पवार कुटुंबाशी आमचे जुने, जिव्हाळ्याचे स्नेह आहेत. महाराष्ट्राला सदैव आधार देणाऱ्या या कुटुंबाला या अपार दुःखातून सावरण्याची शक्ती पांडुरंग परमेश्वर देवो, हीच प्रार्थना.

---

## बजाज जनरल इन्श्युरन्स कडून 'फेटल फ्लरिश' रायडरची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड अग्रगण्य प्रायव्हेट जनरल इन्श्युरन्स कंपनीने त्यांनी 'फेटल फ्लरिश' या रायडरची घोषणा केली आहे. विशेषत: गर्भस्थ शिशूच्या आरोग्यासाठी हे रायडर अत्यंत उपयुक्त मानले जाते. ही सुविधा अधिक जोखमीच्या गर्भधारणांसाठी आणि आधुनिक गर्भातील उपचारांसाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करते. आजवर उपलब्ध असलेल्या पारंपरिक मॅटर्निटी इन्श्युरन्स मध्ये अशाप्रकारचा बाबींचा अंतर्भाव नव्हता. या रायडरची उपलब्धता "माय हेल्थ केअर प्लॅन" आणि "हेल्थ गार्ड" या फ्लॅगशिप प्रॉडक्ट सह करण्यात आली आहे.




फेटल फ्लरिश मध्ये प्रसूतीपूर्व काळजीमध्ये गंभीर आवश्यकता पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञता आणि इन्श्युरन्स यांचे एकत्रित संयोजन पाहायला मिळते. पारंपरिक मातृत्वाशी संबंधित उत्पादने प्रसूती व प्रसूतीनंतरच्या उपचारांवर लक्ष केंद्रित करतात; मात्र हे रायडर गर्भातील सर्वात नाजूक टप्प्यात—आईच्या गर्भाशयात असलेल्या गर्भस्थ शिशूच्या संरक्षणावर लक्ष केंद्रित करतो.

अहवालांनुसार भारतातील सुमारे १७% टक्के महिला ३५ वयानंतर मातृत्व स्वीकारत असल्यामुळे गर्भधारणेशी संबंधित गुंतागुंत वाढत आहे. उच्च जोखीम असलेल्या गर्भधारणांच्या उपचारांसाठी ॲम्निओसेंटेसिस, फेटल रिडक्शन, फेटोस्कोपिक लेझर सर्जरी आणि इंट्रायुटेरिन ट्रान्सफ्युजन या वैद्यकीय उपचारांची आवश्यकता वाढली आहे. आतापर्यंत, स्वतंत्र इन्श्युरन्स प्रॉडक्ट नसल्यामुळे अशा उपचारांचा संपूर्ण खर्चाचा भार अनेकवेळा कुटुंबालाच सहन करावा लागत होता.

उत्पादन अनावरण वेळी बोलताना, बजाज जनरल इन्श्युरन्सचे एमडी व सीईओ डॉ. तपन सिंघल म्हणाले, "गर्भधारणा हा प्रत्येक कुटुंबासाठी अत्यंत महत्वाचा क्षण असतो. जो आशा, अपेक्षा आणि बाळासाठी सर्वोत्तम करण्याच्या इच्छेने समर्पित असतो. जेव्हा वैद्यकीय जटिलता उद्भवतात, तेव्हा कुटुंबांना अतिशय प्रारंभिक टप्प्यावर कठीण निर्णयांचा सामना करावा लागतो. गर्भस्थ काळजीतील वैद्यकीय प्रगतीने वेळेआधी हस्तक्षेप शक्य केला आहे. पण आर्थिक दबाव हा आधीच भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक असलेल्या अनुभवात अधिक भर घालतो.

फेटल फ्लरिश या रायडरच्या माध्यमातून आवश्यक उपचार प्रक्रियांना पाठबळ देत आम्ही हा भार कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. जेणेकरून पालकांना खर्चाऐवजी उपचारांवर आणि परिणामांवर लक्ष केंद्रित करता येईल. ही ऑफर जीवनाच्या अतिशय प्रारंभिक टप्प्यापासूनच काळजी आणि संरक्षण सुरू व्हायला हवे, या आमच्या विश्वासाचे प्रतिबिंब आहे."

---

## प्रजासत्ताक दिनानिमित्त अंजनी ग्रामपंचायतीचा अनोखा उपक्रम

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तर हळदी -कुंकू सोहळ्या निमित्त डस्टबिनचे वाटप

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अंजनी ग्रामपंचायतीने सामाजिक उत्तरदायित्व आणि स्वच्छतेचा संदेश देणारे दोन अनोखे उपक्रम राबविले. सरपंच महेश भुजंगराव हांडे यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले, शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले तर गावातील महिलांसाठी आयोजित हळदी-कुंकू सोहळ्यात 'डस्टबिन' भेट देऊन पर्यावरणाप्रती आपली बांधिलकी जपली.

सोमवारी, २६ जानेवारी रोजी ध्वजारोहणानंतर शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी त्यांना स्कूल बॅग देण्यात आल्या. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद






द्विगुणित झाला होता.दुसरीकडे, गावातील महिलांना एकत्र आणून हळदी-कुंकू सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ प्रथा न पाळता, 'स्वच्छ भारत' अभियानाला बळकटी देण्यासाठी प्रत्येक महिलेला ग्रामपंचायतीच्या वतीने डस्टबिनचे वाटप करण्यात आले. 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' या संकल्पनेला चालना देण्यासाठी हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला.घराघरातून कचरा व्यवस्थापनाची सुरुवात व्हावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

या सोहळ्याला अंजनी गावातील महिला लोकप्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती लाभली यामध्ये सरपंच प्रा. सौ. विजया महेश हांडे उपसरपंच: श्रीमती भिवराबाई बाबाराव गावंडे ग्रामपंचायत सदस्या: सौ. निर्मलाबाई भुजंगराव हांडे, सौ. मंजुषा सिद्धार्थ गावंडे, सौ. बसवाबाई नागोराव हांडे, सौ. अहिल्याबाई शेषराव हांडे, सौ. उमा महेश हांडे, सौ. सागरबाई मारुती हांडे व सौ. सुजाता जयदीप गावंडे सरपंच महेश भुजंगराव हांडे व समस्त ग्रामपंचायत सदस्यांच्या या कल्पक उपक्रमाचे पंचक्रोशीत भरभरून कौतुक होत आहे.

---

## प्रोस्टेट कॅन्सरसाठी 'फोकल वन®' रोबोटिक HIFU थेरपी सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

रूबी हॉल क्लिनिकने कर्करोग उपचार क्षेत्रात एक ऐतिहासिक टप्पा गाठत भारतीय उपखंडातील पहिली फोकल वन® रोबोटिक हाय-इंटेन्सिटी फोकस्ड अल्ट्रासाऊंड (HIFU) थेरपी प्रोस्टेट कॅन्सरसाठी सुरू केली आहे. ही अत्याधुनिक, नॉन-इनवेसिव्ह उपचार पद्धत रूबी हॉल क्लिनिकमध्ये नव्याने सुरू झालेल्या कल्याणी इन्स्टिट्यूट ऑफ रोबोटिक HIFU थेरपी येथे रुग्णांसाठी उपलब्ध असेल. या सुविधेचे उद्‌घाटन रूबी हॉल क्लिनिकचे नेतृत्व डॉ. पी. के. ग्रँट, डॉ. सायमन ग्रँट आणि डॉ. हिमेश गांधी तसेच कल्याणी कुटुंबाचे प्रतिनिधी डॉ. बाबा कल्याणी, सौ. सुनीता कल्याणी आणि भारत फोर्जचे श्री. अमित कल्याणी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

---

## शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा, यशाचा गौरव

- चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयाला 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

चांदमल ताराचंद बोरा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी ग्रामीण विभागातील 'उत्कृष्ट महाविद्यालय' हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, शिस्तबद्ध प्रशासन व सर्वांगीण विकासाभिमुख कार्याची ही पावती मानली जात आहे.

शैक्षणिक गुणवत्ता, उत्कृष्ट पायाभूत सुविधा, नाविन्यपूर्ण उपक्रम, संशोधनात्मक कार्य, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच शिस्तबद्ध व प्रभावी प्रशासन या सर्वच बाबींमध्ये




महाविद्यालयाने सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

'माझी आई माझ्या कॉलेजात', 'रसिकलालजी सामान्य ज्ञान स्पर्धा', विविध समाजाभिमुख उपक्रम, संशोधन व आविष्कार उपक्रम, प्रभावी प्लेसमेंट सेल, पारदर्शक मूल्यमापन प्रणाली तसेच स्टार्टअप्ससाठी राबविण्यात येणारे उपक्रम यामुळेच हा मानाचा सन्मान प्राप्त झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या यशामागे महाविद्यालयाचे नियामक मंडळ अध्यक्ष प्रा. प्रकाशजी धारिवाल, शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष धरमचंदजी फुलपगर, सचिव नंदकुमार निकम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एच. एस. जाधव, समितीचे समन्वयक डॉ. एस. बी. भोईटे, समिती सदस्य, विभागप्रमुख, सर्व प्राध्यापकवृंद, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी यांच्या एकत्रित परिश्रमातून हे यश साध्य झाले आहे.

---




## कोपरखैरणे येथे भव्य चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन!

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नवी मुंबईतील कोपरखैरणे येथे २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त चेतना क्लिनिकच्या वतीने भव्य चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन भरत नाईक साहेब, एस.बी. ग्रुपचे कल्पेश खनिया, रुक्स्मणीबेन खनिया चॅरिटेबल ट्रस्ट तसेच डॉ. मुकेश एम. चंद्र (चेतना क्लिनिक) यांच्या पुढाकाराने करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून तुषार माने (क्राईम ब्रँच हेड) तर विशेष उपस्थिती सुदाम पालवे (क्राईम ब्रँच) यांनी लावली. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष प्रतिष्ठा लाभली.

---

## विकास क्रांती सेनेचा अकोले आगारला इशारा बस डेपो बंद! ठिय्या जनआंदोलन!

- बससेवा सुरू करा अन्यथा बस डेपो बंद करून ठिय्या जनआंदोलन

**घारगाव : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील पठार भागात कोरोना महामारी नंतर वारंवार विनंती अर्ज करूनही बससेवा पूर्ववत सुरू केल्या नसल्याने येत्या १० दिवसात बससेवा पूर्ववत सुरू न झाल्यास अकोले बस डेपो बंद करत अकोले बसस्थानकावर ठिय्या जनआंदोलन करण्याचा इशारा विकास क्रांती सेनेने अकोले बस डेपो आगार प्रमुख यांना मंगळवार दि.२७ जानेवारी रोजी निवेदन देत इशारा दिला आहे.




> कोरोना महामारीनंतर बससेवा बंद झाल्या त्या अद्याप पर्यंत सुरू झाल्या नाही.वारंवार विनंती अर्ज करूनही शासन मागण्यांची दखल घेत नाही.अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू आहे.शासनाकडून वयोवृद्ध व्यक्ती, महिला, विद्यार्थ्यांसाठी प्रवासाबाबत विविध योजना सुरू आहेत. परंतु सदर योजनांपासून सदर भागातील नागरिक वंचित राहत आहे.त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मोठे ठिय्या जनआंदोलन उभे करणार आहोत.
>
> **- (अध्यक्ष भगवानदादा काळे विकास क्रांती सेना)**

> वारंवार लोकप्रतिनिधी, अकोले आगार प्रमुख यांचेशी संपर्क साधत, तथा समक्ष भेट घेत मागणी केली.परंतु सर्वसामान्य जनतेची हक्काची लालपरी बससेवा सुरू करण्यासाठी सबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत मनमानी कारभार हाकत आहे. सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी तीव्र ठिय्या जनआंदोलन करणार आहोत.

अकोले व संगमनेर तालुक्यातील पठार भागातील ब्राम्हणवाडा, चैतन्यपूर, बेलापूर, बदगी, जांभळे, भक्ताचीवाडी, म्हसवंडी, आंबी दुमाला, कुरकुटवाडी, जाचकवाडी या गावांसाठी कोरोना महामारीपूर्वी अकोले पुणे, अकोले परेल, आभाळवाडी अकोले, नगर कोतुळ, अकोले कल्याण या बससेवा निरंतर सुरू होत्या. परंतु कोरोना महामारी सारख्या गंभीर संकटावर नागरिकांनी मात केली.विविध ग्रामपंचायत, समाजसेवक, शेतकरी, विद्यार्थी, तरुण, महिला, वयोवृद्ध, नागरिक, सामाजिक, राजकीय संघटना यांनी वारंवार विनंती अर्ज करूनही अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत नागरिकांच्या मागणीला केराची टोपली दाखवत बससेवा पूर्ववत सुरू केल्या नाहीत.

पठार भागातील बोटा ते राजूर राज्य महार्गावरील गावोगावी असलेल्या बस थांब्यावर शेतकरी, महिला, तरुण, वयोवृद्ध व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी व प्रवासी बोटा, आळेफाटा , घारगाव, संगमनेर, तसेच पुणे, नाशिक, अहिल्यानगर, मुंबई सारख्या औद्योगिक वसाहती मध्ये शिक्षण, नोकरी, व्यवसाय, विविध कामा निमित्ताने बसच्या प्रतीक्षेत उभे असलेले दिसून येत आहेत.बससेवा सुरू नसल्याने या सर्वांची प्रवासाबाबत हेळसांड होत आहे.हात दाखवा बस थांबवा असे परिवहन महामंडळाचे ब्रीद वाक्य होते.

परंतु बस येत नसल्याने हात दाखवायचा कुणाला हा गंभीर प्रश्न प्रवाशांपुढे उभा राहिला आहे. शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला यांना सुखाचा वाटणारा प्रवास आता धोक्याचा वाटू लागला आहे. यात प्रवाशांना आर्थिक, शारीरिक त्रासासह मानसिक त्रास नाहक सहन करावा असल्याने येत्या १० दिवसांत बससेवा पूर्ववत सुरू न झाल्यास अकोले आगार बंद करत अकोले बसस्थानकावर ठिय्या जनआंदोलन करण्याचा इशारा विकास क्रांती सेनेचे अध्यक्ष समाजसेवक भगवानदादा काळे, उपाध्यक्ष सरपंच जालिंदर गागरे, कार्याध्यक्ष इंजि. संतोष फापाळे, सचिव पत्रकार सतीश फापाळे यांनी निवेदनाद्वारे अकोले आगार प्रमुख दराडे यांना दिला आहे.

